**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**तक्रार क्र.२००९/४२९/०२**

**श्री.प्यारेलाल. हि.करोतिया**
**एच ५०१, सिध्दिविनायक रेसीडेन्सी,**
**कल्याण शीळ रोड, टाटापावर जवळ,**
**देशमुख होम्स, कल्याण (पु) ४२१ ३०४.** **.... अपीलकार**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी,**
**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,**
**५ वा मजला, गृह निर्माण भवन,**
**वांद्रे (पू), मुंबई ४०० ०५१.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

तक्रारदार श्री.प्यारेलाल करोतिया यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अनुसार दि.०२.०७.२००९ व दि.२२.०७.२००९ रोजी तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर दि.०५.०९.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता गैरतक्रारदार हजर होते. तक्रारदार अनुपस्थित होते. सुनावणीचेवेळी गैरतक्रारदाराचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच तक्रारीतील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

तक्रारदाराने माहितीच्या अधिकारात गैरतक्रारदाराकडे अर्ज करुन, परिशिष्ट-२, झोपडपट्टी धारकांची संम्मतीपत्र, झोपडीधारकाची पुरावे, संस्था आणि विकासक यांचेमध्ये झालेल्या करारपत्राची प्रत इत्यादी अनुषंगीक माहिती मागीतली होती. गैरतक्रारदाराने दिलेल्या माहितीने समाधान झाले नसल्याने तक्रारदाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले. सदर प्रकरणी तक्रारदाराने मागणी केलेल्या कागदपत्राच्या छायाप्रती, गैरतक्रारदारांनी ३० दिवसाचे आत उपलब्ध करुन द्याव्यात असे राज्य माहिती आयोगाने दि.०१.१०.२००८ रोजी आदेश पारित केले. त्यानंतरही माहिती प्राप्त झाली नसल्याच्या कारणावरुन तक्रारदाराने राज्य माहिती आयोगाकडे तक्रार दाखल केली.

तक्रारदाराने मागणी केलेल्या माहिती पोटी रु.२५००/- इतके शुल्क भरुन माहिती प्राप्त करुन घेणेबाबत तक्रारदारास कळविले असल्याचे गैरतक्रारदारांनी सांगीतले. तक्रारदाराने शुल्क भरले नसल्याने

माहिती पुरविता आली नसल्याचे गैरतक्रारदारांनी तक्रारीवरील सुनावणीचेवेळी प्रतिपादन केले. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, तक्रारदाराने कार्यालयात शुल्काच प्रथम भरणा करावा व माहिती प्राप्त करुन घ्यावी. तक्रारदाराने आवश्यक शुल्क भरल्यानंतर गैरतक्रारदारांनी, तक्रारदारास माहिती पुरवावी.

**आदेश**

**तक्रार निकाली काढण्यात येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**

**दिनांक ०८.०९.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**तक्रार क्र.२००९/४२८/०२**

**श्री.प्यारेलाल. हि.करोतिया**
**एच ५०१, सिध्दिविनायक रेसीडेन्सी,**
**कल्याण शीळ रोड, टाटापावर जवळ,**
**देशमुख होम्स, कल्याण (पु) ४२१ ३०४.** **.... अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**जन माहिती अधिकारी,**
**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,**
**५ वा मजला, गृह निर्माण भवन,**
**वांद्रे (पू), मुंबई ४०० ०५१.** **.... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

तक्रारदार श्री.प्यारेलाल करोतिया यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अनुसार दि.०२.०७.२००९ व दि.२२.०७.२००९ रोजी तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर दि.०५.०९.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता गैरतक्रारदार हजर होते. तक्रारदार अनुपस्थित होते. सुनावणीचेवेळी गैरतक्रारदाराचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच तक्रारीतील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

तक्रारदाराने, गैरतक्रारदाराकडे माहितीच्या अधिकारात अर्ज करुन, परिशिष्ट-२, झोपडपट्टी धारकांची संम्मतीपत्र, झोपडीधारकाची पुरावे, संस्था आणि विकासक यांचेमध्ये झालेल्या करारपत्राची प्रत इत्यादी अनुषंगीक माहिती मागीतली होती. गैरतक्रारदाराने दिलेल्या माहितीने समाधान झाले नसल्याने तक्रारदाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले. सदर प्रकरणी तक्रारदाराने मागणी केलेल्या कागदपत्राच्या छायाप्रती, गैरतक्रारदारांनी ३० दिवसाचे आत उपलब्ध करुन द्याव्यात असे राज्य माहिती आयोगाने दि.०१.१०.२००८ रोजी आदेश पारित केले. त्यानंतरही माहिती प्राप्त झाली नसल्याच्या कारणावरुन तक्रारदाराने राज्य माहिती आयोगाकडे तक्रार दाखल केली.

तक्रारदाराने मागणी केलेल्या माहिती पोटी रु.२५००/- इतके शुल्क भरुन माहिती प्राप्त करुन घेणेबाबत तक्रारदारास कळविले असल्याचे गैरतक्रारदारांनी सांगीतले. तक्रारदाराने शुल्क भरले नसल्याने

माहिती पुरविता आली नसल्याचे गैरतक्रारदारांनी तक्रारीवरील सुनावणीचेवेळी प्रतिपादन केले. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, तक्रारदाराने कार्यालयात शुल्काच प्रथम भरणा करावा व माहिती प्राप्त करुन घ्यावी. तक्रारदाराने आवश्यक शुल्क भरल्यानंतर गैरतक्रारदारांनी, तक्रारदारास माहिती पुरवावी.

**आदेश**

**तक्रार निकाली काढण्यात येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक ०८.०९.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**तक्रार क्र.२००९/३४९/०२**

**श्री. चंद्रभान कमल ठाकूर**
**बिल्डींग नं.१४२ डी, १ ला मजला,**
**रुम नं.२, लालबाग मंदिर,**
**भूलेश्वर रोड, मुंबई ४०० ००२.** **.... अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**जन माहिती अधिकारी,**
**न्यास नोंदणी कार्यालय,**
**धर्मादाय आयुक्त यांचे कार्यालय,**
**२ रा मजला, ८३, डॉ.ॲनीबेझंट रोड,**
**वरळी, मुंबई ४०० ०१८.** **.... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

तक्रारदार श्री.चंद्रभान कमल ठाकूर यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ६ अनुसार गैरतक्रारदार यांचेकडे अर्ज करुन गोस्वामी श्री.घनश्यामलालजी महाराज चीमणलालजी वल्लभीय पुण्यतीमार्गीय धार्मिक विश्वस्ताबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. गैरतक्रारदाराने, प्रथम अपिलीय प्राधिका-याने महिती दिली नसल्याने तक्रारदाराने राज्य माहिती आयोगाकडे क्र.रामाआ २००९/अपील १२७२ अ/०२ हे व्दितीय अपील दाखल केले होते. सदर व्दितीय अपीलावर सुनावणी आयोजित करुन राज्य माहिती आयोगाने दि.१३.०४.२००९ रोजी खालीलप्रमाणे आदेश पारित केले. "दि.३१.०३.२००४ व दि.३१.०३.२००६ या कालावधीची हिशोब पत्रके प्राप्त करुन त्याच्या प्रती अपीलकारास पुरवाव्यात. न्यासाकडे असलेले भाडे, भाडेकरु, न्यायालयीन प्रकरणे इत्यादीबाबतची माहिती न्यासाकडून तक्रारदारास पुरविली जात नाही. म्हणून प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सार्वजनिक न्यास नोंदणी यांनी, न्यास नोंदणी अधिनियमातील तरतुदीचा वापर करुन न्यासाकडील माहिती अपीलकारास १५ दिवसात पुरवावी."

राज्य माहिती आयोगाच्या आदेशानंतर एक महिन्याहून अधिक कालावधी उलटून गेला तरी माहिती गैरतक्रारदाराने तक्रारदारास पुरविली नसल्याने, तक्रारदाराने राज्य माहिती आयोगाकडे उक्त अधिनियमातील कलम १८ अन्वये दि.२६.०५.२००९ रोजी तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर दि.०७.०९.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता गैरअर्जदार हजर होते. तक्रारदार अनुपस्थित होते. सुनावणीचेवेळी गैरतक्रारदाराचे ऐकून घेण्यात आले. तक्रारदारास मागणीप्रमाणे माहिती पुरविण्यात आली असल्याचे तसेच तक्रारदाराने माहिती स्विकारली असल्याची पोच गैरतक्रारदारांनी आयोगास सुनावणीचेवेळी दाखवली. यावरुन तक्रारदारास माहिती पुरविण्यात आल्याचे दिसून आले. यावरुन तक्रारदारास माहिती पुरविण्यात आली असल्याची खात्री होते. तक्रारदार सुनावणीस अनुपस्थित होते. या परिस्थिती मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**तक्रार निकाली काढण्यात येत आहे.**

**मुंबई**
**दिनांक ०८.०९.२००९**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३१७७/०२**

**श्री. अन्सारी मोहम्मद अतीक**
**मोमीनपुरा पत्रा चाळ नं.१,**
**रुम नं.१, मिल्क स्ट्रीट,**
**भायखळा (प), मुंबई ४०० ०११.** **.... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा सहा.आयुक्त**
**ए.ओ.सोसायटी, शिवाजी मार्केट, मुंबई.**

**जन माहिती अधिकारी तथा अधिक्षक,**
**मुंबई शहर, नगर भूमापन विभाग,**
**जुने जकात घर, फोर्ट, मुंबई ४०० ००१.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री. अन्सारी अतीक यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.०६.०६.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.३१.१०.२००८ रोजी अर्ज करुन, सीटी सर्व्हे क्र.१८४०/५ हफीज अल्ली बहादूरखान मार्ग, मुंबई येथील पीलामाला इमारत बांधकामाकरिता श्री.इब्राहीम मोमीम, विकासक मेसर्स अबू इंटरप्रायझेस यांनी सादर केलेल्या कागदपत्राच्या प्रतीची मागणी केली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.१०.०९.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीचेवेळी जन माहिती अधिकारी हजर होते. अपीलकार उपस्थित नव्हते. सुनावणीचेवेळी जन माहिती अधिकारी यांचे म्हणने ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, इमारत बांधकामाकरिता विकासकाने सादर केलेल्या कागदपत्राच्या छायाप्रतीची मागणी केली

होती. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही. जन माहिती अधिका-यांची सदर कृती निश्चितच योग्य नाही. राज्यात माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ ची काटेकोरपणे अमंलबजावणी करणे आवश्यक आहे. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास हे आदेश प्राप्त झाल्यापासून ३० दिवसाचे आत अपीलकारास माहिती पुरवावी.

**आदेश**

**अपील मान्य करण्यात येत आहे.**

**मुंबई**
**दिनांक १७.०९.२००९**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३२१२/०२**

**श्री. गांधी अय्यकन्नू कोंडर**
**अन्ना नगर न्यू लिंक रोड,**
**शिवशक्ती एस.आर.ए, को.ऑ.हो.सो.लि.**
**अंधेरी (प), मुंबई ४०० ०५३.** **.... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी,**
**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण (अभियांत्रिकी विभाग)**
**५ वा मजला, गृह निर्माण भवन,**
**वांद्रे (पू), मुंबई ४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी,**
**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण (अभियांत्रिकी विभाग)**
**५ वा मजला, गृह निर्माण भवन,**
**वांद्रे (पू), मुंबई ४०० ०५१.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री. गांधी अय्यकन्नू कोंडर यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.०७.०७.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२४.०२.२००९ रोजी अर्ज करुन, अण्णा नगर, कासम नगर सी.टी.एस.क्र.८२५/ व ८२५/२ न्यु लिंक रोड, अंधेरी (प) येथील एस.आर.ए. योजनेबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास अर्जातील मुध्दा क्र.१, २, ३ बाबत माहिती दिली नाही. अर्जातील मुध्दा क्र.४ बाबत दिलेल्या माहितीने अपीलकाराने समाधान झाले नाही. यामुळे अपीलकाराने प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे दि.०७.०७.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. अपीलकाराच्या अर्जातील मुध्दा क्र.१ ते ४ ची माहिती पूर्वपरवानगीने कार्यालयीन कामकामाच्या दिवशी ३ ते ५ या वेळात प्राप्त करुन घ्यावी. मुध्दा क्र.२ व ३ बाबत माहिती कार्यालयात उपलब्ध आहे. सदर माहिती कार्यालयात उपस्थित राहून व्यक्तीश: प्राप्त करावी असे अपीलकारास कळविले. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले आहे.

सदर अपीलावर दि.१५.०९.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीचेवेळी जन माहिती अधिकारी हजर होते. अपीलकार उपस्थित नव्हते. सुनावणीचेवेळी जन माहिती अधिकारी यांचे म्हणने ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, अण्णानगर, कासम नगरबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. प्रादेशिक परिवहन कार्यालय, मुंबई (प) कार्यालयाकडिल ७५२२ चौ.मी.जागा झोपडपट्टी पुनर्विकासाकरिता देण्यात आली. सदर जागा विकसित करण्याबाबत प्रादेशिक परिवहन अधिकारी (प), मुंबई आणि विकासक यांचेत (MOU) करारपत्र करण्यात आला. करारपत्राची (MOU) प्रत प्रादेशिक परिवहन अधिका-याकडून, जन माहिती अधिका-यांनी प्राप्त करुन घ्यावी व ती अपीलकारास पुरवावी. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

**अपील मान्य करण्यात येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**

**दिनांक १७.०९.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/२८८७ अ/०२**

**श्री. विश्वास दत्ताराम धुरी**
**६/६०३ इ विंग,**
**लालबागचा राजा सहकारी गृहनिर्माण संस्था,**
**लालबाग, मुंबई ४०० ०१२.** **.... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा सहा.आयुक्त,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका,**
**एफ/दक्षिण विभाग कार्यालय,**
**डॉ.बाबासाहेब आंबेडकर मार्ग,**
**परळ नाका, मुंबई ४०० ०१२.**

**जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (इमारत प्रस्ताव) शहर**
**बृहन्मुंबई महानगरपालिका,**
**एफ/दक्षिण विभाग कार्यालय,**
**डॉ.बाबासाहेब आंबेडकर मार्ग,**
**परळ नाका, मुंबई ४०० ०१२.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री. विश्वास धुरी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.०३.०३.२००८ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे अर्ज करुन, श्री गणेश नगर लालबाग, मार्केट येथील सी.एस.क्र.४९, १/४९, २/४९, १२३ या मुंबई महानगरपालिकेच्या भुखंडावर लालबागचा राजा सहकारी गृहनिर्माण संस्थेमार्फत राबविण्यात येणा-या पुनर्वसन योजनेबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी माहिती दिली नाही. सदर प्रकरणी सहाय्यक आयुक्त एफ/दक्षिण विभाग हे अपीलकारास माहिती देणार आहेत म्हणून अपीलकाराचा अर्ज त्यांचेकडे हस्तांतरित करण्यात आला असल्याचे जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.०३.०१.२००८ च्या पत्रान्वये कळविले. यामुळे अपीलकाराने प्रथम

अपिलीय प्राधिका-याकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी एकतर्फी निर्णय दिला. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.१०.०९.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीचेवेळी जन माहिती अधिकारी, प्रथम अपिलीय प्राधिकारी तसेच अपिलकार हजर होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, पुनर्वसन योजनेबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिकारी, प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी अपीलकारास माहिती दिली नाही. सदर प्रकरणी अपीलकारास सहाय्यक आयुक्त, एफ/दक्षिण हे माहिती देणार आहेत असे जन माहिती अधिकारी तथा कार्यालय अधिक्षक (आयुक्त) (प्र.) श्री.भा.अ.कुलकर्णी यांनी अपीलकारास दि.०३.०१.२००८ च्या पत्रान्वये कळविले होते. पंरतू अपीलकारास माहिती पुरविण्यात आली नाही. सहाय्यक आयुक्त, एफ/दक्षिण यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून ३० दिवसाचे आत अपीलकारास माहिती द्यावी.

**आदेश**

**अपील मान्य करण्यात येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक १७.०९.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३२०७/०२**

**श्री. सेलवीन हेनरीक**
**मॅरी क्नोल अपार्टमेंट,**
**प्लॉट नं.३४, फ्लॅट नं.३,**
**ओरलेम मालाड, मुंबई ४०० ०६४. .... अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका,**
**वृक्ष विभाग, पी/उत्तर विभाग,**
**लिर्बर्टी गार्डन, मालाड,**
**मुंबई ४०० ०६४.**

**जन माहिती अधिकारी,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका,**
**वृक्ष विभाग, पी/उत्तर विभाग,**
**लिर्बर्टी गार्डन, मालाड,**
**मुंबई ४०० ०६४. .... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार श्री. सेलवीन हेनरिक यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२५.०६.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२३.०३.२००९ रोजी अर्ज करुन, प्लॉट नं.३४, सीटी.सर्व्हे क्र.२५६ वळनाई गाव मालाड (प) मुंबई ४०० ०६४ येथील मेरी क्लोन अपार्टमेंट सहकारी गृहनिर्माण संस्थेतील झाडाच्या फांद्याची छाटणी अवैद्यरित्या केली असल्याने याकरिता परवानगीची प्रत व इतर अनुषंगीक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.२३.०३.२००९ च्या पत्रान्वये माहिती दिली. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी दि.२५.०५.२००९ रोजी आदेश पारित केले. झाडांच्या फांदयांची छाटणी करण्याकरिता श्री.पारखे, कनिष्ठ ट्री ऑफिसर यांना प्रथम अपिलीय

प्राधिका-यांनी आदेश दिले की, झाडांच्या फांद्यांची छाटणी करण्याकरिता संस्थेस दि.१८.०३.२००९ च्या पत्रान्वये परवानगी दिली आहे. त्याची प्रत रु.२/- शुल्क घेउन देण्याबाबत आदेश दिले. मागीतलेली माहिती मिळाली नसल्याच्या कारणावरुन राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.१४.०९.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीचेवेळी जन माहिती अधिकारी तसेच अपिलकार हजर होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, झाडाच्या फाद्यांची छाटणी करण्यास दिलेल्या परवानगीबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. झाडाच्या फांद्याची छाटणी करण्यास सहकारी गृहनिर्माण संस्थेने म.न.पा. कडे परवानगी मागीतली होती. या आधारे संस्थेस म.न.पा.ने क्र.असीपीएन/४५१६६/अेईएम/एचअे, दि.१८.०३.२००९ अन्वये परवानगी दिली. सदर पत्राची प्रत अपीलकारास पुरविण्यात आली. संस्थेच्या परिसरातील झाडे अपीलकाराच्या मालकीची आहेत. म्हणून संस्थेने झाडाच्या फाद्यांची छाटणी करण्यासाठी अपीलकाराची परवानगी घेणे आवश्यक असल्याचे अपीलकाराने व्दितीय अपीलावरील सुनावणीवेळी प्रतीपादन केले. अपीलकाराचे सदर म्हणने स्विकारण्याजोगे नाही. कारण झाडाच्या फाद्यांची छाटणी करिता संस्थेने म.न.पा.कडे रितसर अर्ज करुन परवानगी घेउन छाटणी केली आहे. सदर प्रकरणी आवश्यकती कार्यालयातील उपलब्ध माहिती अपीलकारास पुरविण्यात आली आहे. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**मुंबई**
**दिनांक १७.०९.२००९**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३१७८/०२**

**दीव्य शहा असोसिएट**
**६, भागोदया इमारत,**
**७९, नागीनदास मास्टर रोड,**
**फोर्ट, मुंबई ४०० ००१.** **.... अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी,**
**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,**
**५ वा मजला, गृह निर्माण भवन,**
**वांद्रे (पू), मुंबई ४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी,**
**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,**
**५ वा मजला, गृह निर्माण भवन,**
**वांद्रे (पू), मुंबई ४०० ०५१.** **.... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार दीव्य शहा असोसिएट यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२९.०५.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.०५.१२.२००८ रोजी अर्ज करुन, बेहरामबाग, न्यू लिंक रोड, आदर्श नगर, ओशीवरा, जोगेश्वरी (प), मुंबई येथील सि.टी.सर्व्हे क्र.१३५ येथील गुरु नानक सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या पुनर्विकासाबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिकारी / प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी दिलेल्या माहितीने समाधान झाले नसल्याने अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.१०.०९.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपिलकार हजर होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, आराधना गुरुनानक सहकारी गृहनिर्माएण संस्थेच्या पुनर्विकासाबाबत खाली नमुद केलेल्या मुद्यांबाबत माहिती मागीतली होती.

१) परिशिष्ट-१ ची प्रत, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने पुनर्विकासाचा प्रस्ताव मंजूर केलेल्या अर्जाची प्रत

२) आराधना गुरुनानक सहकारी गृहनिर्माण संस्थेची नोंदणीसंबंधीची कागदपत्र.

३) सक्षम अधिका-याने साक्षांकित केलेल्या परिशिष्ट-२ ची प्रत.

४) झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने मंजूरी दिलेल्या व निर्गमित केलेल्या सूचना पत्राची प्रत.

५) झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने निर्गमित केलेल्या Intent पत्राची प्रत.

६) नकाशे आराखडयाची प्रत.

७) इमारत पुनर्विकासासाठी ना हरकत प्रमाणपत्राची प्रत.

८) झोपडपट्टी धारकांना गाळे हस्तांतरित करण्याबाबतच्या शासन निर्णय इत्यादि अनुषंगीक माहिती मागीतली होती.

सदर प्रकरणी मागणीप्रमाणे माहिती पुरविण्यात आलेली नाही. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, आराधना गुरुनानक गृहनिर्माण संस्था व वर नमुद केलेल्या एकूण ८ मुद्यांबाबत सविस्तर माहिती हे आदेश प्राप्त झाल्यापासून ३० दिवसाचे आत अपीलकारास पुरविण्यात यावी.

**आदेश**

**अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**मुंबई**
**दिनांक १७.०९.२००९**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३२०५/०२**

**श्री. डॉ.तुलसीदास गोरधनदास अग्रवाल**
**८/गुरूप्रसाद इमारत, प्रभादेवि, मुंबई ४०० ०२५. .... अपीलकार**

**विरूध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा कार्यकारी अभियंता**
**बृहन्मुंबई महानगरपालिका,**
**जी/दक्षिण विभाग कार्यालय,**
**एल.एम.जोशी मार्ग, लोअर परेल,**
**मुंबई ४०० ०१३.**

**जन माहिती अधिकारी तथा सहा.अभियंता**
**बृहन्मुंबई महानगरपालिका,**
**जी/दक्षिण विभाग कार्यालय,**
**एल.एम.जोशी मार्ग, लोअर परेल,**
**मुंबई ४०० ०१३. .... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री.डॉ.तुलसीदास अग्रवाल यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२४.०६.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२७.०१.२००९ रोजी अर्ज करून, अपीलकाराने दि.१०.१२.२००८ आणि दि.२३.१२.२००८ रोजी कार्यालयात सादर केलेल्या अर्जावर केलेल्या कारवाईची अनुषंगीक माहिती (Action Taken) मागीतली होती. अपीलकाराने मागणी केलेली माहिती कार्यकारी अभियंता (इमारत प्रस्ताव) ई-विभाग, सहाय्यक अभियंता (पाणी विभाग) जी/दक्षिण विभाग यांचेशी काही माहिती संबंधीत असल्याने अपीलकाराचा अर्ज संबंधीताकडे पाठविला असल्याचे अपीलकारास दि.२६.०२.२००९ च्या पत्रान्वये कळविले. तसेच काही माहिती सदर कायद्यांतर्गत येत नाही. काही माहिती कार्यालयात उपलब्ध नसल्याचे वरील दि.२६.०२.२००९ च्या पत्रान्वये कळविले. जन माहिती अधिका-याने संबंधित विभागाकडून माहिती प्राप्त करुन घेउन एकत्रितपणे माहिती दिली नाही म्हणून प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे प्रथम अपील दाखल केले. जन माहिती अधिका-यांनी दिलेल्या माहितीचे

समर्थन करुन प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी दि.२२.०४.२००९ रोजी आदेश पारित करुन अपील निकाली काढले. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.१४.०९.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीचेवेळी जन माहिती अधिकारी तसेच अपिलकार हजर होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, दि.१०.१२.२००८ व दि.२३.१२.२००८ रोजी सादर केलेल्या पत्रावर केलेल्या कार्यवाहीची माहिती मागीतली होती. अपीलकाराने व्दितीय अपीलावरील सुनावणीचेवेळी सांगीतले की, मागणीप्रमाणे माहिती प्राप्त झाली आहे. सदर प्रकरणी यापुढे पाठपुरावा करावयाचा नाही असेही अपीलकाराने सांगीतले. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**मुंबई**
**दिनांक १७.०९.२००९**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३२०५/०२**

**श्री. देवचंद्र एकनाथ रणदिवे**
**ए-विंग, खो.क्र.३०२, बिल्डिंग नं.२,**
**इंदिरा गांधी, सहकारी गृहनिर्माण संस्था,**
**ए.के.मार्ग, बांद्रा (पू), मुंबई ४०० ०५१.** **.... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी**
**जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांचे कार्यालय,**
**प्रशासकीय इमारत, १० वा मजला,**
**सरकारी वसाहत, बांद्रा (प), मुंबई ४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी तथा अपर चिटणीस**
**जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांचे कार्यालय,**
**प्रशासकीय इमारत, १० वा मजला,**
**सरकारी वसाहत, बांद्रा (प), मुंबई ४०० ०५१.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री.देवचंद्र रणदिवे यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२६.०६.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.०३.०१.२००९ रोजी अर्ज करुन, प्रशासकीय इमारतीच्या तळमजल्यात पुस्तक व प्रदर्शनाकरिता परवानगी दिली आहे. त्याच्या दस्तऐवजाची पाहणी व आवश्यक दस्तऐवजाची छायाप्रती, पुस्तक विक्री व प्रदर्शनाकरिता परवानगीच्या तरतुदीची माहिती तसेच तळमजल्यात चालणा-या पुस्तक विक्रीची परवानगीची माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी दि.१२.०३.२००९ रोजी सुनावणी आयोजित केली. आदेश पारित केले नाहीत. यामुळे अपीलकाराने राज्य माहिती आयेगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.१५.०९.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीचेवेळी जन माहिती अधिकारी तसेच प्रथम अपिलीय प्राधिकारी हजर होते. अपिलकार उपस्थित नव्हते. सुनावणीचेवेळी जन माहिती अधिका-यांचे म्हणने ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, प्रशासकीय इमारतीच्या तळमजल्यातील पुस्तक प्रदर्शनाबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. अपीलकारास प्रत्यक्ष भेटीच्यावेळी पुस्तक प्रदर्शनाच्या परवानगीबाबतच्या पत्राची प्रत प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी दिली असल्याचे प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणीचेवेळी आयोगासमोर प्रतिपादन केले. यावरुन अपीलकारास मागणीप्रमाणे माहिती प्राप्त झाली असल्याचे दिसून येते. अपीलकार व्दितीय अपीलावरील सुनावणीचेवेळी अनुपस्थित होते. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**मुंबई**
**दिनांक १७.०९.२००९**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/२९१०/०२**

**श्री. विकास गोंविद भोसले**
**१/२७ राधाकृष्ण निवास,**
**डॉ.आंबेडकर मार्ग, अग्निशमन केंद्रा शेजारी,**
**दादर (पू), मुंबई ४०० ०१४.** **.... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा अधिष्ठाता**
**के.ई.एम.रुग्णालय,**
**परळ, मुंबई ४०० ०१२.**

**जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी आरोग्य अधिकारी**
**एफ/दक्षिण कार्यालय, बृहन्मुंबई महानगरपालिका,**
**डॉ.आंबेडकर, परळ, मुंबई ४०० ०१२.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री.विकास भोसले यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१४.०३.२००८ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.११.१२.२००७ रोजी अर्ज करुन, एच ओ/९६८/ओ.ई.१ दि.०५.०३.२००४ या क्रमाखाली जारी करण्यात आलेल्या कनिष्ठ अवेक्षकाच्या बदल्या संबंधीच्या आदेशाबाबत एकूण १० मुद्यावर माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही. यामुळे अपीलकाराने प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे दि.११.०१.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. अपीलकाराने व्यक्तीश: माहिती प्राप्त करणार असल्याचे अर्जात नमुद केले होते. म्हणून अपीलकाराने मागणी केलेली माहिती कार्यालयात उपलब्ध आहे. सदर माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी कार्यालयाशी व्यक्तीश: संपर्क साधावा असे जन माहिती अधिका-यांनी दि.२३.०१.२००८ च्या पत्रान्वये अपीलकारास कळविले. अपीलकारास मुध्देनिहाय माहिती दि.२५.०१.२००८ च्या पत्रान्वये उपलब्ध करुन दिली. माहिती विलंबाने दिली. अपूर्ण दिली असल्याच्या कारणावरुन अपीलकाराने राज्य माहिती आयेगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.१०.०९.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीचेवेळी जन माहिती अधिकारी हजर होते. अपिलकार उपस्थित नव्हते. सुनावणीचेवेळी जन माहिती अधिका-यांचे म्हणने ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, कनिष्ठ आवेक्षकाच्या बदल्याबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.२५.०१.२००८ च्या पत्रान्वये मुध्देनिहाय सविस्तरपणे माहिती पुरविली असल्याचे अपीलातील कागदपत्रावरुन दिसून येते. अर्जातील मुध्दा क्र.७ कोंडवाडा विभागाशी संबंधित असल्यामुळे याबाबतची माहिती कोंडवाडा अधिकारी यांच्या कार्यालयाकडून प्राप्त करुन द्यावी असे जन माहिती अधिकारी यांनी अपीलकारास कळविले आहे. अपीलकार व्दितीय अपीलावरील सुनावणीकरिता अनुपस्थित होते. जन माहिती अधिका-यांनी अर्जावर कार्यवाही केली असल्याने या प्रकरणी मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**मुंबई**
**दिनांक १७.०९.२००९**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/२८११/०२**

**श्री. भालचंद्र नारायण भोईर**
**१/बी-१३, केसले रामनगर,**
**एस.व्ही.रोड, बोरीवली (प),**
**मुंबई ४०० ०९२.** **.... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी,**
**महाराष्ट्र ज्ञानप्रसारक मंडळ,**
**य.ब.चव्हाण हायस्कूल,**
**इरानीवाडी, कांदिवली (प),**
**मुंबई ४०० ०६७.**

**जन माहिती अधिकारी,**
**महाराष्ट्र ज्ञानप्रसारक मंडळ,**
**य.ब.चव्हाण हायस्कूल,**
**इरानीवाडी, कांदिवली (प),**
**मुंबई ४०० ०६७.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री.भालचंद्र भोईर यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.०५.०२.२००८ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२४.१०.२००७ रोजी अर्ज करुन, महाराष्ट्र ज्ञान प्रसारक मंडळ या संस्थेच्या कामकामाची माहिती आणि त्या संदर्भात दस्तऐवजाच्या प्रतीची मागणी केली होती. सदर प्रकरणी जन माहिती अधिकारी / प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी विहित कालावधीत माहिती पुरविली नसल्याने अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.१०.०९.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीचेवेळी प्रथम अपिलीय प्राधिकारी हजर होते. अपिलकार उपस्थित नव्हते. सुनावणीचेवेळी प्रथम अपिलीय प्राधिका-यांचे म्हणने ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, महाराष्ट्र ज्ञान प्रसारक मंडळ संस्थेच्या कामकाजाबाबत माहिती मागीतली होती. अपीलकाराने विश्वस्थ मंडळाकडून (Trust) माहिती मागीतली आहे. विश्वस्थ मंडळ (Trust) माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही असा मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ नागपूर यांनी याचिका क्र.५२९४/२००८ मध्ये निर्णय दिला आहे. याबाबत प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी व्दितीय अपीलावरील सुनावणीचेवेळी प्रतिपादन केले. मा.उच्च न्यायालयाचे आदेश तसेच प्रथम अपिलीय प्राधिका-यांचे प्रतिपादन लक्षात घेता मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**मुंबई**
**दिनांक १७.०९.२००९**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३२२९/०२**

**श्री. गिरीश एस.चौधरी**
**१४, भाई जिवांजी लेन,**
**२ रा मजला, ठाकूरव्दार,**
**मुंबई ४०० ००२.** **.... अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी,**
**मुंबई इमारत दुरूस्ती आणि पुर्नरचना (म्हाडा)**
**गृहनिर्माण भवन, बांद्रा, मुंबई**

**जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता**
**C-3-4 Div. M.B.R. & R. मंडळ,**
**१०-१२ रोपा लेन, चंदनवाडी, मुंबई ४०० ००२.** **.... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार श्री.गिरीश चौधरी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.०८.०७.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२३.१०.२००८ रोजी अर्ज करुन, भजीवानजी लेन बाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नसल्याने अपीलकाराने प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे दि.१२०५.२००९, १६.०६.२००९ प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.१६.०९.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीचेवेळी प्रथम अपिलीय प्राधिकारी हजर होते. अपिलकार उपस्थित नव्हते. सुनावणीचेवेळी प्रथम अपिलीय प्राधिका-यांचे म्हणने ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, भजीवानजी लेन बाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा

कार्यकारी अभियंता यांनी अपीलकारास मागणीप्रमाणे माहिती पुरविली असल्याचे अपीलकाराने दि.१४.०९.२००९ लेखी निवेदन आयोगास सादर करुन कळविले आहे. तसेच दि.०८.०७.२००९ रोजी आयोगाकडे सादर केलेले व्दितीय अपील परत घेण्यास परवानगी देण्याची विनंती केली आहे. सदर प्रकरणी अपीलकारास मागणीप्रमाणे माहिती मिळाली असल्याने या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**मुंबई**
**दिनांक १७.०९.२००९**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३२०४/०२**

**श्री. संजय गंगाराम पवार**
**अंबाचाळ वाडी, जंहागीर मेरवानजी पथ,**
**परळ, मुंबई ४०० ०१२.** **.... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी,**
**मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,**
**गृहनिर्माण भवन, वांद्रे (पू), मुंबई ४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी तथा मिळकत व्यवस्थापक (w)**
**मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,**
**गृहनिर्माण भवन, वांद्रे (पू), मुंबई ४०० ०५१.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री.संजय गंगाराम पवार यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२४.०६.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२०.०२.२००९ रोजी अर्ज करुन, मा.उच्च न्यायालयाच्या आदेशान्वये फक्त मॅनग्रोव्हण पासून ५० मिटर अंतरावर असलेल्या भुखंडातील मालवणी-मालाड ०५१ या प्रकल्पाच्या विकसनास स्थगिती देण्यात आलेली आहे? कृपया सदरबाबतीत खुलासा करुन सदर पर्यावरण निर्बंध बाधीत भूखंडाचा आराखडा व निवारा प्रकल्पाबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. यामुळे अपीलकाराने प्रथम अपिलीय प्राधिका-यांकडे दि.२३.०३.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. मागणी विस्तृत स्वरुपाची असल्यामुळे, माहिती संकलित करण्याचे काम सुरु असून, ते पूर्ण झाल्यानंतर माहिती पुरविण्यात येईल असे अपीलकारास दि.१९.०३.२००९ च्या पत्रान्वये कळविले. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.१४.०९.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीचेवेळी जन माहिती अधिकारी उपस्थित नव्हते. अपिलकार हजर होते. सुनावणीचेवेळी अपिलकाराचे म्हणने ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, निवारा प्रकल्पाबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती.  जन माहिती अधिकारी / प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी, अपीलकारास विहित कालावधीत माहिती दिली नाही.  सदर दोन्ही अधिका-यांची कृती निश्चितच योग्य नाही.  राज्यात माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ ची काटेकोरपणे अमंलबजावणी करणे आवश्यक आहे.  या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यानंतर अपीलकारास ३० दिवसाचे आत माहिती पुरवावी.

**आदेश**

**अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**मुंबई**
**दिनांक १७.०९.२००९**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३२३२/०२**

**श्रीमती. रशिदा खान**
**१०४, मालवनी रिध्दी-सिध्दी को.ऑ.हौ.सो.लि,**
**म्हाडा गेट नं.९, प्लॉट नं.३४, मालवली,**
**मालाड (प), मुंबई ४०० ०९५.** .... अपीलकार

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा विक्रीकर सह आयुक्त (मुख्या १)**
**विक्रीकर भवन, माझगांव, मुंबई ४०० ०१०.**

**जन माहिती अधिकारी तथा अप्पर विक्रीकर आयुक्त**
**विक्रीकर भवन, माझगांव, मुंबई ४०० ०१०.** .... उत्तरवादी

**<u>विवेचन</u>**

अपीलकार श्रीमती रशिदा खान यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.०९.०७.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२०.०२.२००९ रोजी अर्ज करुन, १५ ते ३० वर्षे सलग्न सेवा करुनही विक्रीवर निरीक्षकाची सेवा अभावीत ठेवण्यात आली त्याबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. न्याय मिळवून देण्याबाबत विनंती केली होती. श्री.टी.आर.रामनानी यांनी अपीलकारास दि.३१.०३.२००९ च्या पत्रान्वये माहिती दिली. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे अपील दाखल केले. सदर अपीलावर दि.२५.०५.२००९ रोजी सुनावणी आयोजित केली. सुनावणीकरिता अपीलकार उपस्थित राहिले नाहीत म्हणून अपील खारिज केले. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.१६.०९.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीचेवेळी जन माहिती अधिकारी उपस्थित होते. अपिलकार हजर नव्हते. सुनावणीचेवेळी जन माहिती अधिका-यांचे म्हणने ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, विक्रीकर निरीक्षकाच्या अभावीत सेवेबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. माहिती विस्तृत व जास्त प्रमाणात असल्याने संबंधित विभागाकडून कार्यालयाकडे उशिरा म्हणजे दि.३१.०३.२००९ रोजी प्राप्त झाली. त्याच दिवशी अपीलकारास माहिती पुरविण्यात आली असल्याचे जन माहिती अधिका-यांनी व्दितीय अपीलावरील सुनावणीचेवेळी लेखी अहवाल सादर करुन प्रतिपादन केले. अपीलकार सुनावणीकरिता अनुपस्थित होते. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**मुंबई**
**दिनांक १७.०९.२००९**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३२३३/०२**

**श्री.मच्छिंद्र एन. करळकर**
**हाजाराबाई हाउस, रूम नं.५,**
**इर्ला सोसायटी रोड,**
**विलेपार्ले (प), मुंबई ४०० ०५६.** .... अपीलकार

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा सहा.आयुक्त**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, के/पश्चिम विभाग कार्यालय,**
**पालिरामपेठ, अंधेरी स्टेशन समोर (प),**
**मुंबई ४०० ०५८.**

**जन माहिती अधिकारी तथा एम.ओ.एच.**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, के/पश्चिम विभाग कार्यालय,**
**पालिरामपेठ, अंधेरी स्टेशन समोर (प),**
**मुंबई ४०० ०५८.** .... उत्तरवादी

**विवेचन**

अपीलकार श्री.मच्छिंद्र करळकर यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२५.०६.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.०३.०१.२००९ रोजी अर्ज करुन, बृहन्मुंबई महानगरपालिका के/पश्चिम विभागात किती कोणकोणत्या श्रेणीची हॉटेल (खाद्यगृह) आहेत याबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. संबंधीत फाईलचे निरीक्षण करुन मागणी केलेल्या निवडक कागदपत्राच्या प्रती, प्रती प्रत रु.२/- इतके शुल्क आकारुन माहिती पुरविण्यात येईल असे जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.२१.०१.२००९ च्या पत्रान्वये कळविले. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे दि.०७.०२.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी दि.१९.०३.२००९ रोजी सुनावणी आयोजित केली. सदर सुनावणीकरिता अपीलकार अनुपस्थित होते. यामुळे अपीलकारास संबंधित कागदपत्र निरीक्षणासाठी उपलब्ध करुन

द्यावीत असे प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी जन माहिती अधिका-यांना आदेश दिले.  यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.१६.०९.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली.  सुनावणीचेवेळी जन माहिती अधिकारी उपस्थित होते.  अपिलकार हजर नव्हते.  सुनावणीचेवेळी जन माहिती अधिका-यांचे म्हणने ऐकून घेण्यात आले.  तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, म.न.पा. के/पश्चिम विभागातील हॉटेलबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती.  जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास मागीणीप्रमाणे माहिती देण्याची तयारी दर्शविली आहे.  तत्पूर्वी संबंधीत फाईल / कागदपत्राचे अपीलकाराने निरीक्षण करावे.  त्यानंतर अपीलकाराने निवड केलेल्या निवडक कागदपत्राच्या छायाप्रती देण्याची जन माहिती अधिका-याची तयारी आहे.  परंतू सदर offer चा अपीलकाराने उपयोग करुन घेतला नाही असे अपीलातील कागदपत्रावरुन दिसून येते.  या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, अपीलकाराने कार्यालयात उपस्थित राहून संबंधित कागदपत्राचे प्रथम निरीक्षण करावे.  त्यानंतर आवश्यकत्या कागदपत्राच्या छायाप्रती जन माहिती अधिका-याकडून प्राप्त करुन घ्याव्यात.

## आदेश

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**मुंबई**
**दिनांक १८.०९.२००९**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३२३४/०२**

**श्री.मच्छिंद्र एन. करळकर**
**हाजाराबाई हाउस, रूम नं.५,**
**इर्ला सोसायटी रोड,**
**विलेपार्ले (प), मुंबई ४०० ०५६.** **.... अपीलकार**

**<u>विरूध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा सहा.आयुक्त**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, के/पश्चिम विभाग कार्यालय,**
**पालिरामपेठ, अंधेरी स्टेशन समोर (प),**
**मुंबई ४०० ०५८.**

**जन माहिती अधिकारी तथा एम.ओ.एच.**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, के/पश्चिम विभाग कार्यालय,**
**पालिरामपेठ, अंधेरी स्टेशन समोर (प),**
**मुंबई ४०० ०५८.** **.... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार श्री.मच्छिंद्र करळकर यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२५.०६.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२९.१२.२००८ रोजी अर्ज करुन, हॉटेल पापीलोन फास्ट फुड सेंटर, बी, हाजारीबाई हाउस, इर्ला सोसायटी रोड, विलेपार्ले (प), मुंबई ४०० ०५६ हे अपीलकाराच्या निवासस्थान शेजारी आहे. सदर हॉटेलच्या स्वयंपाकगृहात मोठमोठी ग्रायंडर मशिन व इतर मशिन आहेत. त्याचा फार मोठा आवाज होतो, फॅनचा मोठा आवाज होतो. याबाबत ४ मुद्यांवर माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही. यामुळे अपीलकाराने प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे दि.०७.०२.२००९ रोजी अपील दाखल केले. अपीलकारास संबंधित कागदपत्र निरीक्षणासाठी उपलब्ध करून द्यावीत. त्यानंतर मागणीप्रमाणे शुल्क आकारुन माहिती पुरवावी असे जन माहिती अधिका-यांना दि.२६.०३.२००९ रोजी आदेश दिले. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयेगाकडे व्दितीय अपील केले.

सदर अपीलावर दि.१६.०९.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली.  सुनावणीचेवेळी जन माहिती अधिकारी उपस्थित होते.  अपिलकार हजर नव्हते.  सुनावणीचेवेळी जन माहिती अधिका-यांचे म्हणने ऐकून घेण्यात आले.  तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, हॉटेल पापीलोन फास्ट फुड सेंटरबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती.  जन माहिती अधिका-यांनी सदर प्रकरणी विहित कालावधीत माहिती दिली नाही.  जन माहिती अधिका-यांची सदर कृती निश्चितच योग्य नाही.  या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत अपीलकारास माहिती पुरवावी.

**आदेश**

**अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**मुंबई**
**दिनांक १८.०९.२००९**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३२१८/०२**

**श्रीमती. जोतीबेन भुपेंद्र बावीसी**
**तळ मजला ओम श्री सिध्दीविनायक को.ऑ.हौ.सो,**
**हनुमान क्रॉस रोड, नं.२, शिवाजी विद्यालया समोर,**
**विलेपार्ले (पू), मुंबई ४०० ०५७. .... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उप मुख्य अभियंता**
**मुंबई अग्नीशामक दल, बृहन्मुंबई महानगरपालिका अग्नीशामक,**
**मरोल नाका, अंधेरी (पू), मुंबई ४०० ०५९.**

**जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता**
**मुंबई अग्नीशामक दल, बृहन्मुंबई महानगरपालिका अग्नीशामक,**
**मरोल नाका, अंधेरी (पू), मुंबई ४०० ०५९. .... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्रीमती.जोतीबेन बावीसी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१३.०७.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.११.१२.२००८ रोजी अर्ज करुन, सीटीएस क्र.१२१६/२-सी सर्व्हे क्र.१४, हीस्या क्र.२ वाईलड उड पार्क समोर, यारी रोड, वर्सोवा, अंधेरी (प), मुंबई ५८ येथील पोसेदान इमारतीस विभागाने दिलेल्या ना हरकत प्रमाणपत्राची प्रत मागीतली होती. अपीलकाराने मागणी केलेल्या माहिती संबंधीची फाईल सापडत नाही. फाईलचा शोध घेण्यात येत आहे. फाईल सापडल्यानंतर अपीलकारास तात्काळ माहिती देण्यात येईल असे जन माहिती अधिका-यांनी दि.०७.०१.२००९ च्या पत्रान्वये कळविले. यामुळे अपीलकाराने प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी घेतली नाही. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.१५.०९.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीचेवेळी जन माहिती अधिकारी तसेच अपिलकार हजर नव्हते. अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, पोसेदान इमारतीसंबंधी ना हरकत प्रमाणपत्राची प्रत मागीतली होती. अपीलकाराने मागणी केलेली माहिती साधी व सोपी आहे परंतू महत्वाची आहे. अपीलकाराने मागणी केलेल्या माहिती संबंधीची फाईल सापडत नाही म्हणून माहिती देता येत नाही असे उत्तर देणे सदर प्रकरणी पुरेसे नाही. जन माहिती अधिका-यांनी संबंधीत फाईलचा शोध घ्यावा. याकरिता इमारती प्रस्ताव विभागाशी संपर्क साधावा. इमारती प्रस्ताव विभागाकडून माहिती प्राप्त करुन अपीलकारास पुरवावी. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई**
**दिनांक १८.०९.२००९**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३०९४/०२**

**श्री. डॉ.मोहन कोंडीबा पाटील**
**सहाय्यक संचालक (नि.) वि.स. व उ.स.,**
**अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षक विभाग यांचे कार्यालय,**
**पुरवठा भवन, जनरल नागेश मार्ग, म.गांधी रूग्णालयाजवळ,**
**परळ, मुंबई ४०० ०१२.** **.... अपीलकार**

**<u>विरूध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी,**
**वित्त विभाग,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी,**
**वित्त विभाग,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.** **.... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार श्री. डॉ. मोहन पाटील यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.३०.०५.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२२.०४.२००९ रोजी अर्ज करून, म.वि. व ले.से.गट-अ (क) श्रेणीतील अधिका-यांच्या सेवा जेष्ठता याद्या, त्या संवर्गाच्या सेवा भरती नियमाच्या आधारे दोन महिन्याच्या आंत सुधारित करण्यासंबंधात मा.महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणाने दि.२५.०२.२००९ रोजी दिलेल्या निवाडयानुसार, सुधारित केलेल्या जेष्ठता यादीच्या प्रती तसेच ज्या अधिका-यांनी अनिवार्य विभागीय परिक्षा उत्तीर्ण केली नाही त्यांच्या विरूध्द सेवा भरती नियमानुसार केलेल्या कार्यवाहीचा तपशिल उपलब्ध करणेबाबत.

जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.२४.०४.२००९ च्या पत्रान्वये खाली नमुद केल्यानुसार माहिती दिली. "याबाबत आपणास असे कळविण्यात येते की, मूळ अर्ज क्र.४०३/२००८ वर मा.महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई यांनी दि.२५.०२.२००९ रोजी दिलेल्या निर्णयानुसार महाराष्ट्र

वित्त व लेखा सेवा गट-अ (कनिष्ठ) या संवर्गातील अधिका-यांची सुधारित जेष्ठतासूची करण्याची कार्यवाही सुरु असून ज्येष्ठतासूची प्रसिध्द झाल्यानंतर त्याची प्रत आपणास उपलब्ध करुन देण्यात येईल, त्यासाठी लेखा व कोषागारे संचालनालयाच्या संपर्कात रहावे. सुधारित जेष्ठता सूची तयार केल्यानंतर ज्या अधिका-यांनी विभागीय परीक्षा विहीत मुदतीत व संधीत उत्तीर्ण केलेली नाही त्यांच्या प्रकरणी सेवाभरती नियमानुसार कार्यवाही करण्याबाबत विचार करण्यात येईल."

सेवाजेष्ठता करण्याची कार्यवाही सुरु असल्याचे जन माहिती अधिका-यांनी कळविले आहे. त्यामुळे सदर माहिती ३० दिवसानंतर देण्यात येणार असल्याने ती विनामुल्य मोफत द्यावी अशी प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे दि.०७.०५.२००९ रोजी प्रथम अपील सादर करुन मागणी केली. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणीची संधी न देता प्रथम अपील निकाली काढले असल्याच्या कारणावरुन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.३१.०८.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी तसेच अपिलकार उपस्थित होते. सुनावणीच्यावेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, सेवाजेष्ठतेबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव, वित्त विभाग, श्री.पु.रा.हरचांदे यांनी अपीलकारास दि.२८.०४.२००९ च्या पत्रानुसार मुध्देनिहाय माहिती पुरविली. याबाबतची पोच व्दितीय अपीलाच्या सुनावणीचेवेळी उतरवादीनी आयेगाच्या निदर्शनास आणली. यावरुन अपीलकारास मागणीप्रमाणे माहिती उपलब्ध करुन देण्यात आली असल्याचे दिसून येते. या परिस्थितीत मी खालील प्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक १८.०९.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३२२७/०२**

**श्री. प्रकाश गोविंद नवाथे**
**२०४, राजबाग, भालचंद्र मार्ग,**
**माटुंगा, मुंबई ४०० ०१९.** **.... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उप मुख्य अभियंता (इ.प्र.शहर)**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, इ विभाग कार्यालय,**
**भायखळा, मुंबई ४०० ००८.**

**जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (इ.प्र.शहर)**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, इ विभाग कार्यालय,**
**भायखळा, मुंबई ४०० ००८.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री.प्रकाश नवाथे यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२३.०६.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२७.०१.२००९ रोजी अर्ज करुन, राजबागच्या ऑक्युपेशन प्रमाणपत्रासंबंधी खालील माहिती मागीतली होती.

वरील विषयांकीत पत्राप्रमाणे सदर इमारतीला स्वंतत्रपणे ऑक्युपेशन सर्टिफिकेट देण्याऐवजी संपूर्ण इमारतीच्या पुर्णत्वाचा दाखला स्विकारण्यात आला आहे असे कळविण्यात आले आहे. ऑक्युपेशन सर्टिफिकेट देण्याऐवजी संपूर्ण बी.सी.सी स्विकारले आहे असे म्हणणेच चुकीचे आहे.

डी.सी.रुल्स १९९१ (जैन आणि भट सॉलीसीटर) प्रमाणे वरील दोन्ही सर्टिफिकेटस स्वतंत्र/भिन्न असून दोन्हीच्या अटी भिन्न आहेत. वरील पुस्तकाप्रमाणे ऑक्युपेशन सर्टिफिकेट हे शेवटचे म्हणजे फायनल सर्टिफिकेट आहे. डी.सी.रुल्सप्रमाणे दोन्ही सर्टिफिकेट देण्याची आवश्यकता असते आणि हीच गोष्ट माहिती आयोगाच्या अपील क्र.१८ या आदेशामध्ये रेकॉर्ड झालेली आहे.

सदर इमारतीच्या पूर्णत्वाचा दाखला स्विकारण्यापूर्वी आर्किटेक्ट / विकासक याना ज्या अटी पूर्ण कराव्या लागल्या त्या अटींची माहिती देण्यात यावी.

सदर इमारतीस ऑक्युपेशन सर्टिफिकेट मिळण्यासाठी आर्किटेक्ट / विकासक याना ज्या अटी पूर्ण कराव्या लागणार त्या अटींची माहिती देण्यात यावी.

दि.२९.०४.२००२ च्या आय.ओ.डी. मधील बी.सी.सी.च्या अटींची माहिती देण्यात यावी.

दि.२९.०४.२००२ च्या आय.ओ.डी.मधील ओ.सी.च्या अटींची माहिती देण्यात यावी.

राजबाग इमारतीच्या धारिणीतील कागदपत्रांची पाहणी केली असता, सदर इमारतीला स्वतंत्रपणे ऑक्युपेशन प्रमाणपत्र देण्याऐवजी संपूर्ण इमारतीच्या पूर्वत्वाचा दाखला स्विकारण्यात आलेला आहे व त्याची प्रत अपीलकारास आधीच प्रदान करण्यात आली आहे असे जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.२०.०१.२००९ च्या पत्रान्वये कळविले. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित करुन दि.२३.१२.२००८ रोजी आदेश पारित केले. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.१६.०९.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीचेवेळी जन माहिती अधिकारी तसेच अपिलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्हीबाजूचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, राजबाग इमारतीच्या ऑक्युपेशन प्रमाणपत्राबाबत माहिती मागीतली होती. राजबाग इमारतीसंबंधी ऑक्युपेशन प्रमाणपत्र देण्यात आले आहे काय? याबाबत अपीलकारास माहिती हवी आहे. राजबाग इमारतीस स्वतंत्रपणे ऑक्युपेश प्रमाणपत्र देण्याऐवजी संपूर्ण इमारतीच्या पूर्णत्वाचा दाखला दिला. यामुळे ऑक्युपेशन प्रमाणपत्र देण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही असे जन माहिती अधिका-यांनी व्दितीय अपीलावरील सुनावणीचेवेळी प्रतिपादन केले.

ऑक्युपेशन प्रमाणपत्र आणि इमारत पुर्णत्वाचा दाखला या दोन्ही बाबीच्या अटी भिन्न आहेत. डी.सी.रुल प्रमाणे दोन्ही प्रमाणपत्र देण्याची आवश्यकता असते असा अपीलकारानी मुध्दा उपस्थित केला आहे. सदर प्रकरणी कार्यालयात उपलब्ध असलेल्या कागदपत्राच्या छायाप्रती अपीलकारास दिल्या आहेत. ऑक्युपेशन प्रमाणपत्र का दिले नाही ही बाब माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही.

सदर कायद्यानुसार उपलब्ध माहिती अपीलकारास पुरवावयाची आहे. सदर प्रकरणी त्याची पूर्तता झाली आहे. अपीलकाराने त्यांचे गा-हाणे दूर करुन घेण्याकरिता सक्षम प्राधिकरणाकडे संपर्क साधावा. यापूर्वीही अपीलकाराने याच विषयावर आयोगाकडे क्र.२००८/१८/०२ हे व्दितीय अपील दाखल केले होते ते निकाली काढले आहे. सदर प्रकरणी मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**मुंबई**
**दिनांक १८.०९.२००९**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३२३६/०२**

**श्री. अर्जुनलाल छाब्रिया**
**बेला विस्टा, फ्लॅट नं.१५,**
**एस.व्ही.रोड, बांद्रा (प),**
**मुंबई ४०० ०५०.** **.... अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा सहा.आयुक्त**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, के/पश्चिम वार्ड,**
**अंधेरी (प), मुंबई ४०० ०५८.**

**जन माहिती अधिकारी तथा सहा. अभियंता (इ व का)**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, के/पश्चिम वार्ड,**
**अंधेरी (प), मुंबई ४०० ०५८.** **.... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार श्री. अर्जूनलाल छाब्रिया यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२९.०६.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.१५.०४.२००९ रोजी अर्ज करुन, बृहन्मुंबई महानगरपालिका, के/पश्चिम विभागातील पालीराम पथ, अंधेरी (प), मुंबई येथील म.न.पा.च्या इमारतीच्या बेसमेंट मध्ये कॅंटीन (खाद्यगृह) चालू आहे. वास्तूशास्त्रज्ञाने कार्यालयीन इमारतीच्या बेसमेंट कारपार्कींगसाठी आरक्षीत दर्शविले आहे कॅंटीनसाठी नाही यासंबंधीच्या मंजूर नकाशासची प्रत मागीतली होती. म.न.पा.च्या आरोगय विभागाने कॅंटीन चालवण्यासाठी लायसन दिलेले नाही. म.न.पा.च्या अग्नीशामन विभागाने ना हरकत प्रमाणपत्र दिलेले नाही. पोलीस लायसन नाही असल्यास त्यासंबंधीच्या कागदपत्राच्या प्रतीची मागणी केली होती. तसेच कॅंटीन चालविण्यासाठी निविदाचौकशी मागविलेल्या निवेदीची प्रत इत्यादी अनुषंगीक माहिती मागीतली होती. कार्यालयात माहिती उपलब्ध नसल्याचे जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.१९.०५.२००९ च्या पत्रान्वये कळविले. यामुळे अपीलकाराने प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे दि.१८.०५.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय

प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.१६.०९.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी उपस्थित होते. अपीलकार उपस्थित नव्हते. सुनावणीच्यावेळी जन माहिती अधिका-यांचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, के/पश्चिम विभागाच्या कार्यालयीन इमारतीच्या बेसमेंटमध्ये चालू असलेल्या कँटीनबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. माहिती कार्यालयात उपलब्ध नाही असे जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास कळविले आहे हे एवढे पुरेसे नाही. सदर प्रकरणी संबंधीत फाईल/ कागदपत्राची तपासणी करुन अपीलकाराने केलेल्या मागणीबाबत मुध्देनिहाय माहिती जन माहिती अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून ३० दिवसाचे आत अपीलकारास माहिती पुरवावी. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

**अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**

**दिनांक १८.०९.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३२३४ अ/०२**

**श्री. अर्जुनलाल छाब्रिया**
**बेला विस्टा, फ्लॅट नं.१५,**
**एस.व्ही.रोड, बांद्रा (प),**
**मुंबई ४०० ०५०.** **.... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा सहा.आयुक्त**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, के/पश्चिम वार्ड,**
**अंधेरी (प), मुंबई ४०० ०५८.**

**जन माहिती अधिकारी तथा सहा. अभियंता (इ व का)**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, के/पश्चिम वार्ड,**
**अंधेरी (प), मुंबई ४०० ०५८.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री. अर्जूनलाल छाब्रिया यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२९.०६.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.०८.०४.२००९ रोजी अर्ज करुन, चिराग स्टुडीओ, दुकान ४ व ५, युनिटी मेन्शन, १८ ए, गझदर रोड, अंधेरी (प) येथील स्टुडीओ मधील मॅझनाईन फ्लोअरच्या अधिकृततेबद्दल माहिती उपलब्ध असल्यास द्यावी अशी मागणी केली होती. अपीलकाराने मागणी केलेली माहिती कार्यालयात उपलब्ध नसल्याबाबत जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.०८.०५.२००९ च्या पत्रान्वये कळविली. यामुळे अपीलकाराने प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे दि.११.०५.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.१६.०९.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी उपस्थित होते. अपीलकार उपस्थित नव्हते. सुनावणीच्यावेळी जन माहिती अधिका-यांचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, चिराग स्टुडीओ मधील मॅझनाईन फ्लोअरच्या अधिकृततेबद्दल माहिती मागीतली होती. अपीलकाराने मागणी केलेल्या माहितीसंबंधी कार्यालयात कागदोपत्राच्या स्वरूपात काहीही माहिती सद्यस्थितीत उपलब्ध नसल्याने अपीलकारास देणे शक्य होत नाही असे जन माहिती अधिका-यांनी व्दितीय अपीलावरील सुनावणीचेवेळी आयोगासमोर लेखी निवेदन सादर करुन प्रतिपादन केले. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

<u>आदेश</u>

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**मुंबई**
**दिनांक १८.०९.२००९**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**तक्रार क्र.२००९/३३३/०२**

**श्री.एस.डब्ल्यू. कोचिकर**
**७, ओम सतलज इर्ला,**
**विलेपार्ले (प), मुंबई ४०० ०५६.** **.... अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**जन माहिती अधिकारी तथा शहर अभियंता,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका,**
**५ वा मजला, महापालिका मार्ग,**
**मुंबई ४०० ००१.** **.... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

तक्रारदार श्री.एस.डब्ल्यू. कोचिकर यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अनुसार दि.१९.०५.२००९ रोजी तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर दि.०४.०९.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता तक्रारदार तसेच गैरतक्रारदार हजर होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच तक्रारीतील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

तक्रारदाराने माहितीच्या अधिकारात गैरतक्रारदाराकडे अर्ज करुन, तक्रारदारास सेवेतून बडतर्फ करण्यापूर्वी मा.न्यायालयाच्या आदेशाचे अवलोकन केले का याबाबातच्या फाईल / कागदपत्राच्या अहवालाच्या प्रतीची मागणी केली होती. गैरतक्रारदाराकडून समाधानकारक माहिती मिळाली नसल्याने तक्रारदाराने राज्य माहिती आयोगाकडे क्र.२००९/२१३८/०२ हे व्दितीय अपील दाखल केले होते. सदर व्दितीय अपीलावर दि.०४.०९.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. अपीलकारास मागणीप्रमाणे माहिती १५ दिवसाचे आत पुरविण्यात यावी असे दि.३०.०३.२००९ रोजी आयोगाने आदेश पारित केले. त्यानंतरही तक्रारदारास माहिती प्राप्त झाली नाही. यामुळे तक्रारदाराने राज्य माहिती आयोगाकडे तक्रार दाखल केली.

तक्रारीवरील सुनावणीवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकून घेण्यात आले. गैरतक्रारदाराकडून समाधानकारक माहिती पुरविण्यात येत नाही असे सुनावणीचेवेळी तक्रारदाराने प्रतिपादन केले. या

परिस्थितीत मी असे आदेश देतो की, गैरतक्रारदारांनी तक्रारदारास सर्व संबंधीत फाईल / कागदपत्र निरीक्षणासाठी उपलब्ध करुन द्यावीत. तक्रारदाराने कार्यालयात उपस्थित राहून फाईल / कागदपत्राचे निरीक्षण करुन निवड करावी. तक्रारदाराने निवड केलेल्या कागदपत्राच्या छायाप्रती गैरतक्रारदारांनी उपलब्ध करुन घ्याव्यात.

**आदेश**

**तक्रार अंशतः मान्य करण्यात येत आहे.**

**मुंबई**
**दिनांक ०८.०९.२००९**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३२३७/०२**

**मे.टी.बी.धोराजीबाला**
**२३२, मौलाना आझाद रोड,**
**दुसरा मजला, रुम नं.२६,**
**टु टँक जवळ,**
**मुंबई ४०० ००८. .... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा अधिक्षक अभियंता,**
**विद्युत विभाग, सा.बा. विभाग, ३ रा मजला,**
**चेंबूर (पू), मुंबई ४०० ०७१.**

**जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता**
**मध्य मुंबई विद्युत विभाग, सा.बा.विभाग,**
**सावली इमारत, गणपत जाधव मार्ग, वरळी,**
**मुंबई ४०० ०१८. .... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार मे. टी.बी. धोराजीवाला यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१६.०७.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.१७.०४.२००९ रोजी अर्ज करुन, कार्यकारी अभियंता, सा.बां.वि. (विद्युत) कार्यालयाकडील निरुपयोगी विद्युत सामग्री निकालात काढण्यासाठी दि.०१.०४.२००७ ते दि.२९.०४.२००९ या कालावधीत किती वेळा कोटेशन, निविदा चौकशी लिलाव करण्यात आले याबाबत अनुषंगीक ४ मुद्याबाबत माहिती मागीतली होती. ज्ञात असलेला ठोक कालावधी व माहितीबाबतचा सविस्तर तपशिल अर्जामध्ये नमुद करावा. भविष्यातील माहिती देता येत नाही असे जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.२१.०४.२००९ च्या पत्रान्वये कळविले. यामुळे अपीलकाराने प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे दि.२५.०५.२००९ रोजी अपील सादर केले. सदर अपीलावर प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती दिली नाही. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.१८.०९.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी, प्रथम अपिलीय प्राधिकारी उपस्थित होते. अपीलकार उपस्थित नव्हते. सुनावणीच्यावेळी जन माहिती अधिकारी / प्रथम अपिलीय प्राधिका-यांचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, निरोपयोगी विद्युत सामग्री निकालात काढल्याबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. अपीलकाराने मागणी केलेली माहिती पुरविण्याकरिता नियमानुसार शुल्क भरण्याबाबत अपीलकारास कळविण्यात आले होते. अपीलकाराने कार्यालयात शुल्क जमा केले नाही. यामुळे माहिती देता आली नसल्याचे जन माहिती अधिका-यांनी सुनावणीचेवेळी प्रतिपादन केले. अपीलकार सुनावणीकरिता उपस्थित नव्हते. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक १९.०९.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३३१७/०२**

**श्री.खैराज देवशी नंदू**
**रूम नं.१/१, सावंत चाळ, विठ्ठलवाडी,**
**आजाद नगर नं.९, अंधेरी (प), मुंबई ४०० ०५३. .... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी,**
**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,**
**५ वा मजला, गृह निर्माण भवन,**
**वांद्रे (पू), मुंबई ४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी,**
**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,**
**५ वा मजला, गृह निर्माण भवन,**
**वांद्रे (पू), मुंबई ४०० ०५१. .... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री. खैराज देवशी नंदू यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.०३.०६.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२७.०१.२००९ रोजी अर्ज करुन, सी.टी.एस.क्र.८३५ (भाग) ४३६ (भाग) ८३९ (भाग) गाव अंबिवली, तालुका अंधेरी, मुंबई उपनगर संबंधी आय.ओ.ए,सी.सी., स्विकृत नकाशासाठी किती फी भरण्यात आली त्या संबंधीच्या पावतीची छायाप्रत मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही. यामुळे अपीलकाराने प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती दिली नाही. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.१८.०९.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी उपस्थित होते. अपीलकार उपस्थित नव्हते. सुनावणीच्यावेळी जन माहिती अधिका-यांचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, आय.ओ.ए, सी.सी., स्विकृत नकाशाकरिता किती फी भरली याबाबत माहिती मागीतली होती. जन माहिती अधिकारी, प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी अपीलकारास माहिती दिली नाही. सदर दोन्ही अधिका-यांची कृती निश्चितच योग्य नाही. राज्यात माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ ची काटेकोरपणे अमंलबजावणी करणे आवश्यक आहे. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून ३० दिवसाचे आत अपीलकारास मागीतलेली माहिती उपलब्ध करुन द्यावी.

**आदेश**

**अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक १९.०९.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३२५१/०२**

**श्री. संजय गोविंद धुवाळी**
**४/३०५, रचना, नविचिखलवाडी,**
**एन.बी.मार्ग, ग्रॅन्ट रोड (प), मुंबई ४०० ००७.** **.... अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा सह मुख्य अधिकारी**
**मुंबई इमारत दुरूस्ती व पुनर्रचना मंडळ,**
**गृहनिर्माण भवन, कला नगर, बांद्रा (पू),**
**मुंबई ४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी तथा उप मुख्य अधिकारी**
**मुंबई इमारत दुरूस्ती व पुनर्रचना मंडळ,**
**गृहनिर्माण भवन, कला नगर, बांद्रा (पू),**
**मुंबई ४०० ०५१.** **.... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार श्री. संजय गोविंद धुवाळी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.०३.०७.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२८.०३.२००८ रोजी अर्ज करुन, १) जाने २००५ ते डिसे, २००७ पर्यंतची मास्टर लिस्टमध्ये मंजूर झालेल्या गाळेधारकाची यादी २) मंजूर झालेल्या गाळेधारकांच्या व्हॅकेशन नोटीसच्या झेरॉक्स प्रती ३) मंजूर झालेल्या गाळेधारकांना वितरित करण्यात आलेल्या गाळयाची माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही. यामुळे अपीलकाराने प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली. अपीलकारास १५ दिवसात माहिती उपलब्ध करुन द्यावी असे जन माहिती अधिकारी यांना आदेश दिले. त्यानंतरही माहिती प्राप्त झाली नसल्याने अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.१८.०९.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी उपस्थित होते. अपीलकार उपस्थित नव्हते. सुनावणीच्यावेळी जन माहिती अधिका-यांचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, मंजूर गाळेधारकाबाबत ३ मुद्यावर माहिती मागीतली होती. जन माहिती अधिकारी, प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी अपीलकारास विहित कालावधीत माहिती दिली नाही. सदर दोन्ही अधिका-यांची कृती निश्चितच योग्य नाही. राज्यात माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ ची काटेकोरपणे अमंलबाजवणी करणे आवश्यक आहे. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत अपीलकारास मोफत माहिती, पोच देय डाकेने पाठवावी.

**आदेश**

**अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**मुंबई** | **(रामानंद तिवारी)**
**दिनांक १९.०९.२००९** | **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३३१६/०२**

**श्री. रामप्रसिध्द टी. मोर्या**
**जमुना यादव चाळ,**
**सुभाष रोड, जनता मार्केट,**
**भांडूप (प), मुंबई ४०० ०७८.** **.... अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा कार्यकारी अभियंता**
**बृहन्मुंबई महानगरपालिका एस विभाग,**
**लालबहादूर शास्त्री मार्ग, भांडूप (प)**
**मुंबई ४०० ०७८.**

**जन माहिती अधिकारी तथा सहा. अभियंता (इ व का)**
**बृहन्मुंबई महानगरपालिका एस विभाग,**
**लालबहादूर शास्त्री मार्ग, भांडूप (प)**
**मुंबई ४०० ०७८.** **.... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार श्री. रामप्रसिध्द मोर्या यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१६.०७.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.०५.०१.२००९ रोजी अर्ज करुन, अपीलकाराने सादर केलेल्या अर्जावर केलेल्या कारवाईची माहिती बांधकामाविरुध्द कोणत्या कलमानुसार नोटीस काढण्यात आली इत्यादी अनुषंगीक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी दि.१०.०२.२००९ च्या पत्रान्वये माहिती दिली. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने प्रथम अपील दाखल केले. अपीलकारास जन माहिती अधिका-याने दिलेल्या उत्तराचे समर्थन करुन प्रथम अपील निकाली काढले. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.१८.०९.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी/ प्रथम अपिलीय प्राधिकारी उपस्थित होते. अपीलकार उपस्थित नव्हते.

सुनावणीच्यावेळी जन माहिती अधिकारी / प्रथम अपिलीय प्राधिका-यांचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, अपीलकाराच्या अर्जावर केलेल्या कारवाईबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. अपीलकारास मागणीप्रमाणे माहिती पुरविण्यात आली असल्याचे जन माहिती अधिकारी / प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी व्दितीय अपीलावरील सुनावणीचेवेळी प्रतिपादन केले. अपीलकार व्दितीय अपीलावरील सुनावणीचेवेळी अनुपस्थित होते. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**मुंबई**
**दिनांक १९.०९.२००९**

(रामानंद तिवारी)
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३२५०/०२**

**श्री. विवेक हरेश्वर म्हात्रे**
**विवेक म्हात्रे तलाव, एकसर तलाव पोलीस चौकीच्या मागे,**
**बोरिवली (प), मुंबई ४०० ०९१.** **.... अपीलकार**

**विरूध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी,**
**गृह विभाग,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी,**
**गृह विभाग,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री.विवेक हरेश्वर म्हात्रे यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१८.०७.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२०.११.२००८ रोजी अर्ज करुन, दिनांक २०.१०.१९९४ ते दिनांक २०.११.२००८ या कालवधीत स्वसंरक्षणासाठी रिव्हॉल्वरचा परवाना कोणाला दिले, कुठल्याकारणासाठी दिले त्याचे विश्लेशन द्यावे अशी मागणी केली होती. जन माहिती अधिका-यांनी दि.०६.०२.२००९ च्या पत्रान्वये माहिती दिली. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने प्रथम अपील दाखल केले. सदर अपीलावर दि.०५.०६.२००९ रोजी सुनावणी घेण्यात आली. दि.०५.०६.२००९ रोजी आदेश पारित करुन अपील निकाली काढले. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.१८.०९.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी तसेच अपिलकार उपस्थित होते. सुनावणीच्यावेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, रिव्हॉल्वर परवान्याबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी, अपीलकारास दिलेली माहिती योग्य असल्याचे प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी समर्थन केले. अपीलकाराने सुनावणीच्या दरम्यान, मागणी केलेला वैयक्तिक शस्त्र परवाना अमान्य केल्यामुळे माहिती मागीतली असल्याचे प्रथम अपिलीय प्राधिका-यांना सांगीतले. अपीलकाराने मागणी केलेली माहिती, माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ७(९) नुसार व्यापक स्वरुपाची असल्यामुळे पुरविता येणार नसल्याचे नमुद करुन दि.०५.०६.२००९ रोजी प्रथम अपीलावर आदेश पारित केले. अर्जावर जन माहिती अधिका-यांनी समर्पक उत्तर दिले असल्याने प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी पारित केलेल्या आदेशात कोणताही फेरबदल करण्याची आवश्यकता वाटत नाही. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक १९.०९.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/१९७८/०२**

**श्री. अरुण गणपत भोवर**
**अे/६०३ साई आशिष जनकल्याण बँकेच्या शेजारी,**
**स्टेशन रोड, विक्रोळी (पूर्व), मुंबई ४०० ०८३. .... अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उपनिबंधक सहकारी संस्था,**
**मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,**
**गृहनिर्माण भवन, वांद्रे (पू), मुंबई ४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी,**
**अरुण निवारा सहकारी संस्था,**
**कन्नवार नगर, विक्रोळी (पू), मुंबई ४०० ०८३. .... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार श्री.अरुण गणपत भोवर यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.०९.१२.२००८ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२७.०७.२००८ रोजी अर्ज करुन, सन २००४ ते २००८ या कालावधीतील अरुण निवारा सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या कार्यकारीणीने संस्थेच्या पदावर आल्यानंतर महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम ७३ (१ ए.बी.) तरतुदीनंतर एम-२० बंधपत्रावर सहया करुन उप निबंधकांना सादर केलेल्या कागदपत्राच्या छायाप्रती, अपीलकाराच्या मालकीच्या रुममध्ये भाडोत्री ठेवण्यास, रुम विकण्यास प्रतीबंध करण्याची कारणे इत्यादी अनुषंगीक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही. यामुळे अपीलकाराने प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे दि.२४.०९.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली. दि.०८.११.२००८ रोजी आदेश पारित केले. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.२३.०६.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी अनुपस्थित होते. तसेच अपिलकार उपस्थित होते. सुनावणीच्यावेळी अपीलकाराचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, अरुण निवारा गृहनिर्माण संस्थेबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. अपीलकाराने सदर संस्थेच्या सचिवाकडे दि.२७.०७.२००८ रोजी अर्ज करुन माहिती मागीतली आहे. सहकारी गृहनिर्माण संस्था माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाहीत. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**<u>आदेश</u>**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**मुंबई**
**दिनांक १९.०९.२००९**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३३२८/०२**

**श्रीमती. रशिदा खान**
**१०४, मालवनी रिध्दी-सिध्दी को.ऑ.हौ.सो.लि,**
**म्हाडा गेट नं.९, प्लॉट नं.३४, मालवली,**
**मालाड (प), मुंबई ४०० ०९५.** .... अपीलकार

**विरूध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उप सचिव (विक्रीकर प्रशासन)**
**वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी,**
**वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.** .... उत्तरवादी

**विवेचन**

अपीलकार श्रीमती रशिदा खान यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.०९.०७.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२०.०२.२००९ रोजी अर्ज करुन, विक्रीकर विभागातील अभावित विक्रीकर निरीक्षकांना न्याय मिळवून देणेबाबत सेवा जेष्ठता सूची व इतर अनुषंगीक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.१७.०४.२००९ च्या पत्रान्वये माहिती दिली. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे दि.२७.०४.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली. अपीलकार सुनावणीकरिता अनुपस्थित होत्या. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी आदेश पारित केले नाहीत. जन माहिती अधिका-यांनी दिलेल्या माहितीचे समर्थन करुन प्रथम अपील फेटाळत आहे असे पत्रान्वये अपीलकारास कळविले. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयेगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.१८.०९.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीचेवेळी जन माहिती अधिकारी तसेच प्रथम अपिलीय प्राधिकारी उपस्थित होते. अपिलकार हजर नव्हते.

सुनावणीचेवेळी जन माहिती अधिकारी / प्रथम अपिलीय प्राधिका-यांचे म्हणने ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, विक्रीकर निरीक्षकाच्या सेवा जेष्ठताबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी, अपीलकारास मागणीप्रमाणे माहिती पुरविण्यात आली असल्याचे व्दितीय अपीलावरील सुनावणीचेवेळी प्रतिपादन केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी लेखी अहवाल आयोगास सादर केला. यावरुन अपीलकारास माहिती पुरविण्यात आली असल्याचे दिसून येते. व्दितीय अपीलावरील सुनावणीचेवेळी अपीलकार हजर नव्हते. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक १९.०९.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**तक्रार क्र.२००९/४१६/०२**

**श्री.जनार्दन ना.वैद्य**
**माजी पोस्ट वार्डन,**
**माहिम मच्छिमार नगर,**
**इमारत क्र.६/२२१, कॉजवे रोड,**
**माहिम (प), मुंबई ४०० ०१६.** **.... अपीलकार**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक भूव्यवस्थापक**
**मुंबई गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळ,**
**गृहनिर्माण भवन, कलानगर, वांद्रे (पू),**
**मुंबई ४०० ०५१.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

तक्रारदार श्री.जनार्दन ना.वैद्य यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अनुसार दि.३१.०१.२००९ रोजी तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर दि.०२.०९.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता तक्रारदार तसेच गैरतक्रारदार हजर होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच तक्रारीतील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

तक्रारदाराने माहितीच्या अधिकारात गैरतक्रारदाराकडे अर्ज करुन, माहिम मच्छिमार नगरातील अनधिकृत स्टॉल अधिकृत करुन देण्याची मागणी केली होती. याबाबत मुंबई गृहनिर्माण क्षेत्रविकास मंडळ, मुंबई यांच्याकडून काहीही कारवाई करण्यात आली नाही. मंडळाचे वसाहतीतील अनधिकृत स्टॉल नियमित करुन त्यांना भाडे आकारणीचे मंडळाचे कोणतेही धोरण नाही. यामुळे अपीलकाराची मागणी नाकारण्यात आली. म्हणून अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे तक्रार दाखल केली. याच विषयावर तक्रारदाराने पूर्वी मुख्य माहिती आयुक्त महाराष्ट्र राज्य यांच्याकडे तक्रार दाखल केली होती. तसेच तक्रारदाराने लोकआयुक्त यांचेकडे अपील केले होते. अनधीकृत स्टॉल अधिकृत करुन देण्याची अपीलकाराची मागणी ही माहितीचा अधिकार अधिनियमाव्दारा करता येणार नाही. त्यासाठी तक्रारदारास संबंधीत कायद्यानुसार वेगळा मार्ग चोखाळावा लागेल असे नमुद करुन अपील निकाली काढले होते.

लोकआयुक्तांच्या सदर निकालाचा उल्लेख करुन मुख्य माहिती आयुक्तांनी तक्रारदाराची क्र.२००७/१२१/०२ ही तक्रार खारीज केली.

सदरप्रकरणी लोकआयुक्त / मुख्य माहिती आयुक्त यांचे आदेश तसेच मंडळाचे वसाहतीतील अनुधीकृत स्टॉल अधिकृत करुन / नियमित करुन त्यांनी भाडे आकारण्याचे मंडळाचे धोरण नाही ही बाब लक्षात घेउन मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**तक्रार खारिज काढण्यात येत आहे.**

**मुंबई**
**दिनांक १९.०९.२००९**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३३१८/०२**

**श्री. विलास लाड**
**१९, मिशन कम्पाउंड, रूम नं.१६,**
**ए.के.मार्ग, नाना चौक,**
**मुंबई ४०० ००७.** **.... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा सहा. आयुक्त**
**बृहन्मुंबई महानगरपालिका,**
**डी विभाग यांचे कार्यालय, जोबानपुत्र कम्पाउंड,**
**नाना चौक, ग्रँट रोड (प), मुंबई ४०० ००७.**

**जन माहिती अधिकारी तथा करनिदारण संकलन अधिकारी**
**बृहन्मुंबई महानगरपालिका,**
**डी विभाग यांचे कार्यालय, जोबानपुत्र कम्पाउंड,**
**नाना चौक, ग्रँट रोड (प), मुंबई ४०० ००७.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री.विलास लाड यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१९.०६.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.०७.०४.२००९ रोजी अर्ज करुन, खालीलप्रमाणे माहिती मागीतली होती.

१) जर आपल्या नियमावलीमध्ये करनिदारण प्रतवर एका रुमचे जर तो तो १० रु भाडे दाखवत असेल व आमच्याकडून दर महा अडीच हजार ते तीन हजार रुपये घेत असेल तर आपल्या नियमात काय बसते त्या नियमाची प्रत.

२) जर तो आपणाकडे कमी भाडे दाखवून आमच्याकडून जास्त भाडे घेत असेल तर आपल्या नियमात काय बसते आपण त्याच्यावर काय कारवाई करु शकता त्यासंदर्भात आपली काय नियमावली आहे त्याची प्रत.

३) द चर्च ऑफ स्कॉटलँड ट्रस्ट याची नोंद आपल्या रजिस्टरमध्ये आहे तर त्याचा पत्ता १९६० पासून ते २००८ पर्यंत काय होता त्याची १९६० पासून ते २००८ पर्यंत करनिदारणाची प्रत कुणाकडे जात होती कुठल्या पत्यावर जात होती त्याची माहिती.

४) द चर्च चर्च ऑफ स्कॉटलँड ट्रस्ट कोण ट्रस्टीची नावे दाखवली होती त्याची माहिती व प्रती.

५) १९६० ते २००८ पर्यंत डी २८७६ (२), यासंदर्भात किती कर भरला जात होता किती कर भरला गेला कशापध्दतीने भरला, कुणी भरला, त्या करनिदारणाची प्रत कुणाला दिली त्याची संपूर्ण माहिती.

६) आपणाकडे द चर्च ऑफ स्कॉटलँड ट्रस्ट व जॉन विल्सन एज्युकेशन सोसायटी याबद्दल काय पत्रव्यवहार आला होता त्यांनी काही पत्ता किंवा नाव बदली करण्यासंदर्भात काही पत्रव्यवहार केला होता का त्याची माहिती.

७) चर्च ऑफ स्कॉटलँड ट्रस्ट व जॉन विल्सन एज्युकेशन सोसायटीमध्ये काही फेरबदल केले आहे का ते कुठल्या नियमाखाली केले त्या नियमावलीची प्रत व त्याबद्दलची संपूर्ण माहिती व प्रत.

८) आपणाकडे दोन्ही ट्रस्ट संदर्भात काय कारवाई केली त्याची माहिती व प्रत.

९) तरी यासंदर्भाची माहिती व प्रती मिळण्याबाबत.

जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.०७.०५.२००९ च्या पत्रान्वये मुद्येनिहाय माहिती दिली. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने दि.१८.०५.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली. अपीलकाराने, जन माहिती अधिका-याकडे उपलब्ध असलेली सर्व कागदपत्र, अभिलेखाची पाहणी कार्यालयीन वेळेत करावी. आवश्यक कागदपत्राच्या प्रती जन माहिती अधिका-याकडून सात दिवसात प्राप्त करुन घ्याव्यात असे प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी आदेश पारित केले. त्यानंतरही माहिती मिळाली नसल्याने अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.१८.०९.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरितो जन माहिती अधिकारी उपस्थित होते. अपिलकार हजर नव्हते. सुनावणीचेवेळी जन माहिती अधिका-यांचे म्हणने ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, डी २८७६ (२) आगस्ट क्रांती मैदान संदर्भात अनुषंगीक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास मागणीप्रमाणे माहिती पुरविली असल्याचे व्दितीय अपीलावरील सुनावणीचेवेळी लेखी अहवाल सादर करुन प्रतिपादन केले. अपीलकार व्दितीय अपीलावरील सुनावणीकरिता अनुपस्थित होते. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**<u>आदेश</u>**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**मुंबई**
**दिनांक १९.०९.२००९**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३२७३/०२**

**श्री. अर्जुनलाल छाब्रिया**
**बेला विस्टा, फ्लॅट नं.१५,**
**एस.व्ही.रोड, बांद्रा (प),**
**मुंबई ४०० ०५०.** **.... अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा मुख्य अभियंता (रस्ता व वाहतुक)**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, मुख्य कार्यालय,**
**महापालिका मार्ग, सी.एस.टी., मुंबई ४०० ००१.**

**जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (वाहतुक)**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, के/पश्चिम वार्ड,**
**अंधेरी (प), मुंबई ४०० ०५८.** **.... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार श्री. अर्जुनलाल छाब्रिया यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१३.०७.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.१५.०४.२००९ रोजी अर्ज करुन, लींकरोड, बानुरनगर गोरेगांव सिग्नल येथील गॅलक्सी हाईट्स इमारत, अे,बी,सी,डी विंगस् येथील सदनिका धारक, वरिष्ठ नागरिक, मुलांच्या सुरक्षेच्या दृष्टीने लिंकरोडवर आणि गॅलक्सी हाईट्स इमारती समोर, तसेच सभोताळी विद्युत पुरवठा करावा. रस्त्यावर विद्युतपुरवठा करण्याकरिता तयार करण्यात आलेला आराखडा / नकाशाच्या छायाप्रती सद्या अस्तीत्वात असलेल्या विद्युत पोलच्या माहितीसह माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.२३.०९.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी तसेच अपिलकार उपस्थित होते. सुनावणीच्यावेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, लिंकरोडवर तसेच गॅलक्सी बिल्डींगच्या सभोताली विद्युत पुरवठा करण्याकरिता तयार करण्यात आलेल्या नकाशाची / आराखडयाची प्रत मागीतली होती. सदर कामासाठी म.न.पा.च्या वास्तुशास्त्रज्ञांनी विकासकास आवश्यक रक्कमेचा कार्यालयाकडे भरणा करण्याबाबत कळविले होते. विकासकाने निश्चित रक्कमेचा भरणा केल्यानंतर विद्युत पुरवठा करण्याचे काम रिलायन्स एनर्जीकडे सोपविण्यात येईल. स्ट्रीट लाईटसाठी रक्कमेचा भरणा केल्याशिवाय इमारत पुर्णत्वाचा दाखला घेउ नये अशी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणास विनंती करण्यात यावी. पुनर्विकासासंबंधीची कागदपत्र अपीलकारास उपलब्ध करुन द्यावीत.

**आदेश**

**अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**मुंबई**
**दिनांक २५.०९.२००९**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३२९५/०२**

**श्री. गोपिनाथ साळवी**
**तिन डोंगरी यशवंत नगर,**
**गोरेगांव (प), मुंबई ४०० ०६२. .... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी,**
**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,**
**५ वा मजला, गृह निर्माण भवन,**
**वांद्रे (पू), मुंबई ४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी,**
**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,**
**५ वा मजला, गृह निर्माण भवन,**
**वांद्रे (पू), मुंबई ४०० ०५१. .... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री. गोपिनाथ साळवी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१५.०७.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.१९.०३.२००९ रोजी अर्ज करुन, तिनडोंगरी यशवंत नगर, गोरेगांव (प), मुंबई येथील झोपडपट्टीच्या पुनर्विकासाच्या कामाबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नसल्याने अपीलकाराने प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे दि.२९.०५.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती दिली नाही. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.२४.०९.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी उपस्थित होते. अपिलकार उपस्थित नव्हते. सुनावणीच्यावेळी जन माहिती अधिका-यांचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, झोपडपट्टीच्या पुनर्विकासाबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास सदर प्रकरणी विहित कालावधीत माहिती दिली नाही. जन माहिती अधिका-याची सदर कृती निश्चितच योग्य नाही. अपीलकाराने, प्रामुख्याने योजनेतील कामे बंद झाल्याबाबत तसेच ती कधी सुरु होणार इत्यादीबाबत माहिती मागीतली आहे. अपीलकाराने मागीतलेली माहिती प्रामुख्याने भाग्योदय सहकारी गृहनिर्माण संस्थेशी निगडीत आहे. मुख्य अधिकारी / म्हाडा यांनी दि.०१.०२.२००५ रोजी निर्गमित केलेल्या प्रमाणित परिशिष्ट-२ मध्ये नमुद केल्याप्रमाणे भाग्योदय सहकारी गृहनिर्माण संस्थेतील १९८ झोपडी धारकाबाबत वाद मुंबई उच्च न्यायालयात न्यायप्रविष्ठ असल्यामुळे त्याबाबतचे वाद मुंबई उच्च न्यायालयात न्यायप्रविष्ठ असल्यामुळे त्याबाबतचे परिशिष्ट-२ निर्गमित करण्यात आले नाही. यामुळे अपीलकाराने विचारलेल्या माहितीबाबतचा भूभाग झोपडपट्टी पुनर्वसन योजनेमध्ये समाविष्ट करण्यात आलेला नाही. असे उतरवादीने व्दितीय अपीलावरील सुनावणीचेवेळी लेखी अहवाल सादर करुन प्रतिपादन केले. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, सदर प्रकरणाची वस्तुस्थिती विषयाची माहिती अपीलकारास जन माहिती अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत पुरवावी.

**आदेश**

**अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**मुंबई**
**दिनांक २५.०९.२००९**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/२५१०/०२**

**श्री. शरद कुलकर्णी**
**४, आर्या टॉवर्स,**
**एसीसीए स्टेडीयम जवळ,**
**औरंगाबाद.** **.... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी,**
**जलसंपदा विभाग,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी,**
**जलसंपदा विभाग,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री. शरद कुलकर्णी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोग, औरंगाबाद यांचेकडे दि.२९.११.२००७ रोजी व्दितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांच्या कार्यालयातील व्हीडीओ कॉन्फरन्स रुममध्ये दि.१४.०५.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी, अपिलकार तसेच अवर सचिव श्री.भि.रा.कुलकर्णी, श्री.प्र.प्र.गोसावी आणि प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उप सचिव श्रीमती ज्योती पोतदार उपस्थित होते.

अपीलकाराने जलसंपदा विभागातील जन माहिती अधिका-याकडे माहितीच्या अधिकारातील दि.०८.०३.२००७ चा अर्ज करण्याऐवजी सचिव, जलसंपदा विभाग यांचेकडे सादर केला होता. मंत्रालयीन विभागात विभागाचे सचिव, जन माहिती अधिकारी / प्रथम अपिलीय प्राधिकारी नाहीत. सर्व संबंधित विभागातील कक्ष अधिकारी, अवर सचिव यांना जन माहिती अधिकारी तर उप / सह सचिवांना प्रथम अपिलीय प्राधिकारी पदनिर्देशित करण्यात आले आहेत.

अपीलकाराने सचिव, जलसंपदा यांचेकडे दि.०८.०३.२००७ च्या अर्जान्वये एप्रिल, १९९९ ते मार्च, २००७ अखेर आरक्षक पदी कार्यरत अभियंते (प्रवर्गनिहाय) माहिती मागीतली होती. कनिष्ठ अभियंता संवर्गातील सरळसेवेने नियुक्ती झालेल्या कर्मचा-याची माहिती ही, माहिती अधिकारी म्हणून संबंधित कार्यालयातील माहिती अधिका-याशी संबंधित आहे. त्यामुळे याप्रकरणी १) जन माहिती अधिकारी, गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, औरंगाबाद यांच्याशी परस्पर संपर्क साधावा. उप अभियंता, कार्यकारी अभियंता, अधिक्षक अभियंता व मुख्य अभियंता या पदावरील कार्यरत अभियंत्याबाबतची माहिती ही २) अवर सचिव (सं.नि.) तथा जन माहिती अधिकारी व अवर सचिव (सेवा) तथा जन माहिती अधिकारी, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेशी संबंधित असल्यामुळे अपीलकाराचा अर्ज पुढील कार्यवाहीसाठी संबंधितांकडे पाठविला असल्याचे जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव जलसंपदा विभाग डॉ.माधव वीर यांनी आपणास दि.१८.०४.२००७ च्या पत्रान्वये माहिती दिली. जन माहिती अधिकारी गोदावरील मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, औरंगाबाद यांनी पाच कार्यालयाची माहिती दि.२८.०५.२००७ च्या पत्रान्वये अपीलकारास पुरविल. उर्वरित ९ कार्यालयाच्या माहितीसाठी त्या कार्यालयाशी परस्पर संपर्क साधण्याबाबत अपीलकारास कळविले. अपीलकाराचा अर्ज त्या कार्यालयाकडे हस्तांतरित केला. नांदूर मधमेश्वर कालवा विभाग क्र. २ वैजापूर मु.वडीगोद्रा यांनी दि.२७.०९.२००७ व दि.०९.१०.२००७ च्या पत्रान्वये अपीलकारास माहिती दिली असल्याचे प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा अधिक्षक अभियंता औरंगाबाद पाटबंधारे मंडळ यांनी अपीलकारास दि.०५.११.२००७ रोजी कळवून प्रथम अपील निकाली काढले आहे. यावरून कनिष्ठ अभियंता संवर्गातील अभियंत्याची माहिती अपीलकारास पुरविण्यात आली असल्याचे दिसते.

उप अभियंता, कार्यकारी अभियंता, अधिक्षक अभियंता व मुख्य अभियंता या पदावरील कार्यरत अभियंत्याबाबतची माहिती संबंधित मंत्रालयातील जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास पुरविली नसल्याचे दिसते. यासाठी अपीलकाराने मंत्रालयातील संबंधित प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उप / सह सचिवाकडे विहित मुदतीत प्रथम अपील दाखल करणे आवश्यक होते. अपीलकाराने, उक्त अधिनियमातील कार्यपध्दतीचा अवलंब केलेला दिसत नाही. राज्यातील जलसंपदा विभागाची विविध प्रादेशिक मंडळ, महामंडळ कार्यालयातील आरक्षण पदी कार्यरत अभियंते याबाबतची माहिती हवी

असल्याच्या अपीलकाराने व्दितीय अपीलात मुध्दा उपस्थित केला आहे. सदर माहिती करिता वरील परिच्छेद ४ मध्ये उल्लेख केल्यानुसार अपीलकाराने सर्व संबंधित जन माहिती अधिकारी / प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे माहितीच्या अधिकारात अर्ज करुन माहिती प्राप्त करणे आवश्यक वाटते. जलसंपदा विभागांतर्गतची विविध प्रादेशिक मंडळ, महामंडळ, कार्यालय हे स्वतंत्र सार्वजनिक प्राधिकरण आहेत. सर्व सार्वजनिक प्राधिकरणाकडील माहिती एकत्रित जमा करुन देण्याची उक्त अधिनियमात तरतुद नाही. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई**
**दिनांक २३.०९.२००९**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३१९४/०२**

**श्री. दयानंद जगन्नाथ सोहनी**
**७/५९/१७८८, टागोर नगर,**
**विक्रोळी (पू), मुंबई ४०० ०८३. .... अपीलकार**

**विरूध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक आयुक्त**
**बृहन्मुंबई महानगरपालिका,**
**एस वॉर्ड भांडूप (प), मुंबई.**

**जन माहिती अधिकारी,**
**परिरक्षण खाते,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका,**
**एस वॉर्ड भांडूप (प), मुंबई. .... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री. दयानंद सोहनी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.०६.०७.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे अर्ज करून, खाली नमुद केलेली माहिती मागीतली होती.

१) टागोर नगर ग्रुप नं.७ येथील स्मशानभूमीती बंद असलेल्या विद्युत वाहिनीचे दुरुस्ती काम आत्ता पर्यंत का करण्यात आले नाही याचा तपशिल.

२) सदर स्मशानभूमीतील कोणकोणती कामे म्हाडाच्या फंडातुन व कोणती कामे महानगरपालिका फंडातुन करण्यात आली आणि त्यासाठी किती फंड मंजूर करण्यात आला त्याचा तपशिल.

३) टोगोर नगर ग्रुप नं.७, येथील स्मशानभुमिचे नुतनीकरण कोणत्या फंडातुन करण्यात आले? त्याचा तपशिल.

४) सदर बांधकामाचे किती कोटेशन आले व कोणत्या ठेकेदाराचे कोटेशन पास केले त्याचा तपशिल.

५) सदर बांधकामासाठी किती फंड मंजुर करण्यात आला होता?

६) सदर बांधकामासाठी पत्रे, पीलर हे कोणत्या दुकानातुन मागविण्यात आले होते व त्यांचा गेज काय? त्याचा तपशिल.

७) सदर बांधकामाच्या झालेल्या तक्रारीवर आपण काय कारवाई केली त्याचा तपशिल?

८) सदर बांधकामाचे जुने स्क्रॅपच्या मटेरीअलचे काय करण्यात आले त्याचा तपशिल?

९) सदर नुतणीकरणाचे काम पूर्ण झाल्यानंतर ते साधारणत: किती वर्ष टिकेल त्याचा तपशिल.

जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास विहित कालावधीत माहिती दिली नाही. यामुळे अपीलकाराने प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे दि.१३.०३.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती दिली नाही. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.११.०९.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी तसेच अपिलकार उपस्थित होते. सुनावणीच्यावेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, टागोर नगर, विक्रोळी (पू), मुंबई येथील स्मशानभूमीबाबत अनुषंगीक एकूण ९ मुद्यावर माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत अपीलकारास मागणीप्रमाणे माहिती दिली नाही. सदर दोन्ही अधिका-यांची कृती निश्चितच योग्य नाही. राज्यात माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ ची काटेकोरपणे अमंलबाजवणी करणे आवश्यक आहे. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून ३० दिवसाचे आत अपीलकारास माहिती द्यावी. अन्यथा जन माहिती अधिकारी यांना जबाबदार धरुन त्यांच्याविरुध्द उक्त अधिनियमातील कलम २० अनुसार शास्ती लादण्याची कारवाई सुरु करण्यात येईल.

**आदेश**

**अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक ३०.०९.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३१६९ अ/०२**

**श्री. शिवराज मारूती नेने**
**बी-२६०/८, शासकीय वसाहत,**
**बांद्रा (पू), मुंबई ४०० ०५१.** **.... अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक कामगार आयुक्त**
**कामगार आयुक्त कार्यालय,**
**कॉमर्स सेंटर, ताडदेव, मुंबई ४०० ०३४.**

**जन माहिती अधिकारी तथा सरकारी कामगार अधिकारी**
**कामगार आयुक्त कार्यालय,**
**कॉमर्स सेंटर, ताडदेव, मुंबई ४०० ०३४.** **.... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार श्री. शिवराज नेने यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२७.०५.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.१२.०१.२००९ रोजी अर्ज करुन, खाली नमुद केलेली माहिती मागीतली होती.

१) सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई ३२ यांनी दि.२४.०४.२००८ रोजीच्या पत्रान्वये विमुक्त जाती व भटक्या जमाती व विशेष मागासप्रवर्गाचे अधिकारी / कर्मचा-यांचे विभागीय पदोन्नती समितीने पात्रता तपासून निवडसूचीमध्ये समावेश केला आहे. अशा अधिकारी / कर्मचा-यांचे पदोन्नती आदेश त्वरीत काढण्याचे आदेश दिले आहेत. तरी माझ्या नावाचा दि.२५.०९.२००६ रोजीच्या दुकाने निरीक्षक, श्रेणी-२ या पदोन्नती पदाच्या निवडसूचीमध्ये समावेश असतांना सुध्दा आजतागायत माझे दुकाने निरीक्षक, श्रेणी-२ या पदावर पदोन्नतीचे आदेश का काढण्यात आलेले नाहीत, त्याबाबतची माहिती देण्यात यावी.

२) दि.०७.०५.२००८, ०९.०६.२००८, ०५.०७.२००८, १३.०८.२००८, ०२.०९.२००८ व २४.०९.२००८ रोजी दुकाने निरीक्षक, श्रेणी-२ या पदावर पदोन्नती देण्याबाबत निवेदने सादर

केलेली आहेत, त्यावर मा.कामगार आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी केलेल्या कार्यवाहीची माहिती देण्यात यावी. अथवा कार्यवाही केली नसल्यास विलंबाची कारणे देण्यात यावी.

अपीलकाराच्या दि.०७.०५.२००८ च्या निवेदनबाबत दि.१८.०५.२००९ रोजी माहिती दिली असल्याचे जन माहिती अधिका-यांनी दि.२०.०५.२००९ च्या पत्रान्वये अपीलकारास कळविले. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने दि.०९.०३.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी आदेश पारित केले नाहीत. यामुळे अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.०९.०९.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी तसेच अपिलकार उपस्थित नव्हते. अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, अपीलकारास दुकाने निरीक्षक श्रेणी-२ या पदावर पदोन्नतीचे आदेश का काढण्यात आले नाहीत याबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास माहिती पुरविली असल्याचे अपीलातील कागदपत्रावरुन दिसून येते. व्दितीय अपीलावरील सुनावणीकरिता दोन्ही पक्षकार अनुपस्थित होते. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**मुंबई**
**दिनांक ३०.०९.२००९**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३२५४/०२**

**श्री. प्रमोद जाधव**
**दोस्त मोहम्मद चाळ नं.२/१,**
**नित्यानंद नगर, घाटकोपर (प),**
**मुंबई ४०० ०८६.** **.... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उप सचिव,**
**गृहनिर्माण विभाग,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी,**
**गृहनिर्माण विभाग,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री. प्रमोद जाधव यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२२.०७.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२१.०५.२००९ रोजी अर्ज करुन, श्री नितीन मधुकर यांच्याकडून आलेल्या जिवेमारण्याच्या धमकीबद्दल व जिवेमारण्याच्या फोन वरुन येणा-या धमक्याबाबत अपीलकाराने मा.मुख्यमंत्री, मा.उप मुख्यमंत्री तसेच उप सचिव, गृह विभाग, पोलीस महासंचालक यांना लिहिलेल्या पत्रावरील कारवाईची माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास माहिती दिली. सदर माहितीने समाधान झाले नसल्याने अपीलकाराने दि.१०.०६.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. जन माहिती अधिकारी यांनी अपीलकारास दिलेल्या माहितीचे समर्थन करुन तसे अपीलकारास दि.२९.०४.२००९ च्या पत्रान्वये कळविले. अपूर्ण माहिती मिळाली असल्याच्या कारणावरुन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.२२.०९.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी तसेच प्रथम अपिलीय प्राधिकारी उपस्थित होते. अपिलकार उपस्थित नव्हते.

सुनावणीच्यावेळी जन माहिती अधिकारी तसेच प्रथम अपिलीय प्राधिका-यांचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, अपीलकारास जिवेमारण्याच्या धमक्या श्री.नितीन मधुकर देत असल्याने त्यांच्या विरुध्द केलेल्या तक्रारीवरील कारवाईची अनुषंगीक माहिती मागीतली होती. अपीलातील कागदपत्राची तपासणी केली असता व व्दितीय अपीलावरील सुनावणीचेवेळी जन माहिती अधिकारी, प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी केलेले प्रतिपादन लक्षात घेता अपीलकारास तक्रारीवर केलेल्या कारवाईची माहिती पुरविण्यात आली असल्याचे दिसून येते. व्दितीय अपीलावरील सुनावणीकरिता अपीलकार अनुपस्थित होते. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**<u>आदेश</u>**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**मुंबई** — **(रामानंद तिवारी)**

**दिनांक ३०.०९.२००९** — **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३२६५/०२**

**श्री. लक्ष्मणराव भोसले**
**अध्यक्ष-महाराष्ट्र राज्य सुरक्षा रक्षक आणि**
**जनरल कामगार युनियन रजि.**
**११३, गौतम उद्योग भवन,**
**एलबीएस मार्ग, पहिला माळा,**
**भांडुप (प), मुंबई ४०० ०७८.** **.... अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी,**
**कामगार विभाग,**
**महाराष्ट्र राज्य, मंत्रालय,**
**मुंबई ४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी,**
**कामगार विभाग,**
**महाराष्ट्र राज्य, मंत्रालय,**
**मुंबई ४०० ०३२.** **.... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार श्री. लक्ष्मणराव भोसले यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१५.०७.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२६.०३.२००८ रोजी अर्ज करुन, खालील माहिती मागीतली होती.

श्रीमती भालेराव यांच्या विनंती अर्जाची प्रत

त्यासंबंधीच्या नाशिक मंडळाच्या अहवालाची प्रत सहाय्यक कामगार आयुक्त व कामगार आयुक्त, मुंबई यांचेकडून प्राप्त झालेल्या अहवालाची प्रत तसेच श्रीमती भालेराव यांच्या नियुक्तीच्या अनुषंगाने विविध स्तरावर झालेली टिप्पणी, अंतीम आदेश यासबंधीच्या टिप्पणीच्या प्रती व श्रीमती भालेराव यांच्या नियुक्तीबाबत सद्यस्थिती व तदअनुषंगीक अन्य पत्रव्यवहाराच्या प्रती मिळाव्यात.

जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही. यामुळे अपीलकाराने प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी माहिती दिली नाही. आदेश पारित केले नाहीत. यामुळे अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.२२.०९.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी, प्रथम अपिलीय प्राधिकारी तसेच अपिलकार उपस्थित होते. सुनावणीच्यावेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, श्रीमती साधना पद्माकर भालेराव यांच्या नाशिक जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळाबाबत माहिती मागीतली होती. जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी श्री.मंगेश बागडे यांनी अपीलकारास विहित कालावधीत माहिती दिली नाही. प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उप सचिव श्री.च.रा.गोसावी यांनी आदेश पारित केले नाहीत. माहिती दिली नाही. सदर दोन्ही अधिका-यांची कृती निश्चितच योग्य नाही. राज्यात माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ ची काटेकोरपणे अमंलबजावणी करणे आवश्यक आहे. सदर प्रकरणी सेवा विषयकबाबी संबंधी माहिती मागीतलेली असल्याने उक्त अधिनियमातील कलम ८(१) (झ) (त्र) चा आधार घेउन माहिती नाकारता येत नाही. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत अपीलकारास मोफत माहिती पुरवावी.

**<u>आदेश</u>**

**अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**मुंबई**
**दिनांक ३०.०९.२००९**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३२५९/०२**

**श्री. डॉ.प्रकाश व्ही. पवार**
**श्रध्दा पोली क्लिनीक,**
**शीव संकल्प इमारत,**
**संभाजी रोड, विष्णु नगर,**
**नवपाडा, ठाणे ४०० ६०२.** **.... अपीलकार**

**विरूध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी,**
**पोलीय निरिक्षकांचे कार्यालय,**
**एम.एच.बी. पोलीस स्टेशन,**
**योगी नगर, बोरीवली,**
**मुंबई.**

**जन माहिती अधिकारी,**
**पोलीय निरिक्षकांचे कार्यालय,**
**एम.एच.बी. पोलीस स्टेशन,**
**योगी नगर, बोरीवली,**
**मुंबई.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री. डॉ.प्रकाश पवार यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१४.०७.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.१८.०४.२००८ रोजी अर्ज करून, अपीलकाराची मुलगी श्रीमती. आश्वीन मयुर पवार-सामंत यांनी एम.एच.बी.पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांचेकडे दि.०३.०४.२००९ रोजी तक्रार दाखल केली. श्रीमती आश्वीनी पवार यांनी भाडेतत्वावर घेतलेल्या सदनिकेची मोडतोड श्री.मयुर सामंत आणि त्यांच्या इतर ३ साथीदारांनी केली. सदनिकेतील चीजवस्तू घेउन गेले. याबाबत अपीलकाराने अनुषंगीक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही. यामुळे अपीलकाराने प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे दि.०३.०६.२००९

रोजी अपील दाखल केले.  प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही.  माहिती दिली नाही.  यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.२२.०९.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली.  सुनावणीकरीता प्रथम अपिलीय प्राधिकारी तसेच अपिलकार उपस्थित होते.  सुनावणीच्यावेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकून घेण्यात आले.   तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, अपीलकाराने श्रीमती. आश्वीनी पवार-सामंत यांनी केलेल्या तक्रारवरील कारवाईबाबत माहिती मागीतली होती.  जन माहिती अधिकारी / प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी माहिती दिली नाही.  सदर दोन्ही अधिका-यांची कृती निश्‍चितच योग्य नाही.  राज्यात केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ ची काटेकोरपणे अमंलबजावणी करणे आवश्यक आहे.  या परिस्थित मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास माहिती मोफत द्यावी.  अपीलकारास माहिती हे आदेश प्राप्त झाल्यापासून ३ आठवडयाचे आत नोंदणी पोच देय डाकेने पाठवावी.

**आदेश**

**अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**मुंबई**
**दिनांक ३०.०९.२००९**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३२६७/०२**

**श्री. फयाझ एस.पठाण**
**ई/०२४, राज तरंग, शिव वल्लभ क्रॉस रोड,**
**रावलपाडा, दहिसर (पू),**
**मुंबई ४०० ०६८.** **.... अपीलकार**

**<u>विरूध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी,**
**सिटी सर्व्हे कार्यालय,**
**४ था मजला, नाटकवाला लेन,**
**बोरीवली (प), मुंबई ४०० ०९२.**

**जन माहिती अधिकारी,**
**सिटी सर्व्हे कार्यालय,**
**४ था मजला, नाटकवाला लेन,**
**बोरीवली (प), मुंबई ४०० ०९२.** **.... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार श्री. फयाझ एस.पठाण यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१५.०७.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.३०.०३.२००९ रोजी अर्ज करुन, डीफंक्ट नॉव्हेव्टी सील्क मीत्स्, एस.व्ही.रोड दहीसर (पू), मुंबई येथील सीटी सर्व्हे क्र.११९२-११९२ (१) ते १९ येथील मालमत्तेचे वैद्य / अवैद्य मालकाबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही. यामुळे अपीलकाराने प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे दि.११.०५.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी आदेश पारित केले नाहीत. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.२३.०९.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी तसेच अपिलकार उपस्थित होते. सुनावणीच्यावेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, वैद्य/अवैद्य मालकाबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. सदर दोन्ही अधिका-यांची कृती निश्चितच योग्य नाही. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास संबंधित दस्तऐवज अपीलकारास निरीक्षणाकरिता उपलब्ध करुन द्यावीत. अपीलकाराने कार्यालयात उपस्थित राहून दस्तऐवजाचे निरीक्षण करुन हव्या असलेल्या कागदपत्राची निवड करावी. त्यानंतर जन माहिती अधिका-यांनी निवडक कागदपत्राच्या छायाप्रती ७ दिवसाचे आत अपीलकारास पुरवाव्यात.

**आदेश**

**अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**मुंबई**
**दिनांक ३०.०९.२००९**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३२७७/०२**

**सचिव, सिल्व्हर कोर्ट स.गृ.संस्था.लि.**
**एम.जी.रोड, घाटकोपर (पू),**
**मुंबई ४०० ०७७.** **.... अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा अधिक्षक अधियंता**
**मुंबई विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग,**
**नवीन प्रशासकिय भवन, ३ रा मजला,**
**आर.सी.रोड, चेंबूर, मुंबई ४०० ०७१.**

**जन माहिती अधिकारी तथा मुख्य अभियंता**
**मुंबई विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग,**
**नवीन प्रशासकिय भवन, ३ रा मजला,**
**आर.सी.रोड, चेंबूर, मुंबई ४०० ०७१.** **.... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार सचिव, सिल्व्हर कोर्ट स.गृ.संस्था.लि. यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१३.०५.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी तथा विद्युत निरीक्षक यांचेकडे दि.१६.०३.२००९ रोजी अर्ज करुन, सिल्व्हर कोर्ट सहकारी गृहनिर्माण संस्था लि. घाटकोपर (पू), मुंबई येथील इमारतीतील उदवाहनाबाबत सन १९९५ पासूनची अनुषंगीक माहिती मागीतली होती. उदवाहना संदर्भातील अभिलेख कार्यालयात ५ वर्षापर्यंत ठेवण्यात येतात. सदर नमुद मुद्याबाबत विचारलेली माहिती ही ५ वर्षापेक्षा जुनी असल्याने ५ वर्षापूर्वीचे अभिलेख नियमाप्रमाणे नष्ट करण्यात आले आहे. त्यामुळे सदर माहिती कागदपत्र उपलब्ध नाहीत असे अपीलकारास दि.१३.०४.२००९ च्या पत्रान्वये कळविले. यामुळे समाधान झाले नसल्यामुळे अपीलकाराने प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे दि.१८.०५.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. अपिलीय प्राधिका-यांनी दि.१९.०६.२००९ च्या पत्रान्वये माहिती दिली. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.२३.०९.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी, प्रथम अपिलीय प्राधिकारी उपस्थित होते. अपिलकार उपस्थित नव्हते. सुनावणीच्यावेळी जन माहिती अधिकारी, प्रथम अपिलीय प्राधिकारी यांचे म्हणने ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, उदवाहनाबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी / प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी अपीलकारास उपलब्ध माहिती पुरविली आहे. अपीलकाराने मागणी केलेली माहिती संबंधी कागदपत्र नष्ट करण्यात आली असल्याने पुरविता आली नाही. ५ वर्षानंतर कागदपत्र कोणत्या नियमानुसार नष्ट करण्यात येतात याबाबतचीही माहिती अपीलकारास देण्यात आली. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**मुंबई**
**दिनांक २९.०९.२००९**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३२८६/०२**

**श्री.मोहन कुरुप**
**बी-३/१, महिंद्रा नगर,**
**डी.पी.रोड, मालाड (पू),**
**मुंबई ४०० ०९७.** **.... अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा अप्पर पोलीस अधिक्षक**
**ठाणे.**

**जन माहिती अधिकारी तथा उप पोलीस अधिक्षक**
**मीरा भाईंदर, जि.ठाणे.** **.... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार श्री.मोहन कुरुप यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१४.०७.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.०६.०४.२००९ रोजी अर्ज करुन, काशिमीरा पोलीस स्टेशन व अपीलकारास अटक करुन पोलीस लॉकअप मध्ये ठेवल्याबाबत एकूण ३० मुद्यांवर अनुषंगीक माहिती मागीतली. जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.१५.०४.२००९ च्या पत्रान्वये मुध्देनिहाय माहिती दिली. त्यामध्ये काही मुद्यांची माहिती उक्त अधिनियमातील कलम ८ (१) (ज) चा आधार घेउन नाकारण्यात आली. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे दि.०४.०५.२००९ रोजी प्रथम अपील केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली. जन माहिती अधिका-याने दिलेल्या माहितीचे समर्थन करुन अपील निकाली काढले. यामुळे अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.२४.०९.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी तसेच अपिलकार उपस्थित होते. सुनावणीच्यावेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, अपीलकाराने एकूण ३० मुद्यांबाबत माहिती मागीतली होती. सदर प्रकरणी अपीलकाराने मागणी केलेली माहिती गुन्हयाशी संबंधीत असल्याने सदर गुन्हाचा तपास चालू असल्याने तपास अधिकारी यांचे कारवाईत तसेच तपासाच्या कामकाजाच्या प्रक्रियेत अडथळा येण्याची शक्यता असल्याने उक्त अधिनियमातील कलम ८ (१) (ज) अनुसार अर्जातील ब-याच मुद्याबाबत माहिती नाकारण्यात आली आहे. सद्यस्थितीत सदर प्रकरणी आरोपपत्र न्यायालयात दाखल करण्यात आले असल्याचे अपीलकाराने प्रतिपादन केले. त्यामुळे अपीलकारास मागणीप्रमाणे माहिती देण्यात उक्त कलम ८ (१) (ज) चा आधार घेउन माहिती नाकारता येत नाही. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, अपीलकाराने मागणी केलेली प्रकरण क्रमांक ३५७/०८ संबंधीची कागदपत्राच्या छायाप्रती हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास द्याव्यात.

**आदेश**

**अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई**
**दिनांक २९.०९.२००९**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक-अपील क्रमांक २००९ /३२९७ /०२**

**श्री.रमेश नागनाथ कदम ------ अपीलकर्ता**
**ए/१,नागनाथ मिस्त्री कंम्पाऊंड,गणेश चौक,**
**काजूपाडा, बोरीवली (पूर्व), मुंबई ६६**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा ------- उत्तरवादी**
**नगर भूमापन अधिकारी यांचे कार्यालय,कांदिवली (प),मुंबई**

**जन माहिती अधिकारी तथा**
**नगर भूमापन अधिकारी यांचे कार्यालय,कांदिवली (प),मुंबई**

**- विवेचन -**

अर्जदार श्री.रमेश कदम यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२३.०६.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.१२.०३.२००९ रोजी अर्ज करुन,नगरभुमापन-दहिसर,ता.बोरिवली,जि.मुंबई उपनगर यांचेकडील सी.टी.सर्व्हे क्र.२२२०,२२२० ड च्या नकाशाची कारणपूर्ती दिलेली नक्कल अर्ज क्रमांक ११९७/दि.२.११.१९९१ च्या अर्जदार श्री.अनिल शहा यांनी सदर नकाशा आपल्या कार्यालयातून घेतला. सदरबाबत कुठल्या आधारे नकाशा आपण त्यांना दिला. त्या नकाशाची छायांकित प्रत मागितली होती. कार्यालयातील धारिकेचे निरीक्षण करुन विहित शुल्क भरुन माहिती प्राप्त करुन घ्यावी असे जन माहिती अधिकाऱ्यांनी दि.१६.०३.२००९ च्या पत्रान्वये अपीलकारास कळविले होते. माहिती मिळाली नसल्याच्या कारणावरुन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.२४.०९.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी तसेच अपिलकार उपस्थित होते. सुनावणीचे वेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज करुन वरील परिच्छेद एक मध्ये नमूद केलेली माहिती मागितली होती. अपीलकाराने मागणी केलेली माहिती

व्यक्तीशः प्राप्त करणार असल्याचे माहितीच्या अधिकारात नमूद केले होते. म्हणून कार्यालयात उपलब्ध असलेल्या धारिकेचे अवलोकन करावे. विहित शुल्क भरुन माहिती प्राप्त करुन घ्यावी असे जन माहिती अधिकाऱ्यांनी अपीलकारास दि.१९.०५.२००९ च्या पत्रान्वये कळविले होते. या परिस्थितीत सदर प्रकरणी मी असे आदेश देतो की अपीलकाराने कार्यालयात उपस्थित राहून संबंधीत धारिकेचे अवलोकन करावे. विड कागदपत्रांच्या छायाप्रती विहित शुल्क आकारुन जन माहिती अधिकाऱ्यांनी अपीलकारास पुरवाव्यात.

**आदेश**

**अपील अशंतः मान्य करण्यात येत आहे.**

**( रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांकः २५.०९.२००९**

राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-अपील क्रमांक २००९ /३२८४ /०२

श्री.श्रीकांत सखाराम प्रभू ------ अपीलकर्ता
वी २३, उदयानप्रभा,तेजपाल स्कीम रोड नं.२,
विलेपार्ले (पूर्व),मुंबई ५७

विरुध्द

प्रथम अपिलीय अधिकारी तथा ------- उत्तरवादी
उपनिबंधक, सहकारी संस्था, (म्हाडा),
मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,गृहनिर्माण भवन,
वांद्रे (पू),मुंबई ४०० ०५१

जन माहिती अधिकारी तथा
सहकारी संस्था, (म्हाडा),
मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,गृहनिर्माण भवन,
वांद्रे (पू),मुंबई ४०० ०५१

- वि वे च न -

अर्जदार श्री.श्रीकांत सखाराम प्रभू, यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१५.०७.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.०२.०३.२००९ रोजी अर्ज करुन, उपनिबंधक, सहकारी संस्था, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ कार्यालयात दि.१७.११.२००८ रोजी दाखल केलेले निमशासकीय पत्र परिशिष्ट क्र.१ जॉईंट चिफ आफीसर म्हाडा यांच्या कार्यालयात दि.२४.०७.२००८ रोजी दाखल केलेले निमशासकीय पत्र परिशिष्ट क्र.२ बाबत माहिती मागितली होती. जन माहिती अधिकाऱ्यांनी विहित आलावधीत माहिती दिली नसल्याने अपीलकाराने प्रथम अपीलीय अधिकाऱ्याकडे दि.२३.०४.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. जन माहिती अधिकाऱ्यांनी अपीलकारास १५ दिवसाचे आत माहिती द्यावी असे प्रथम अपिलीय अधिकाऱ्यांनी दि.५.०६.२००९ रोजी आदेश पारित केले. जन माहिती अधिकाऱ्यांनी अपीलकारास कार्यायात समक्ष बोलावून चर्चा

करुन अपीलकाराच्या सोईुसार आवश्यक कागदपत्राच्या प्रती अपीलकारास पुरविण्यात आल्या असल्याचे अपीलकारास दि.३०.०५.२००९ रोजी कळविले.

सदर अपीलावर दि.२४.०९.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली सुनावणीकरीता अपिलकार उपस्थित होते. जन माहिती अधिकारी उपस्थित नव्हते.सुनावणीच्यावेळी अपीलकाराचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज करुन परिशिष्ट क्र.१ व परिशिष्ट २ चे पत्राबाबत माहिती मागितली होती. अपीलकाराने दि.१७.११.२००८ व दि.२४.०७.२००८ रोजी कार्यालयात सादर केलेल्या पत्रावर केलेल्या कारवाईची माहिती मागितली होती.

यामुळे व्यथीत होऊन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले. जन माहिती अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक श्री.हांडे यांना अपीलकाराने दि.१७.११.२००८ रोजी लिहिलेल्या पत्राबाबत केलेल्या कारवाईची माहिती अपीलकारास देण्यात आली नाही यामुळे माहितीच्या अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ चा भंग केला आहे. याकरिता जन माहिती अधिकाऱ्यांना जबाबदार धरुन त्यांच्याविरुध्द उक्त अधिनियमातील कलम २० नुसार शास्ती लादण्याची कारवाई का करु नये याबाबत हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत आयोगाकडे प्रत्यक्ष भेटून लेखी खुलासा सादर करावा.

अपीलकारास दि.१७.११.२००८ च्या पत्राबाबत केलेल्या कारवाईची माहिती तात्काळ द्यावी.

## आदेश

**अपील मान्य करण्यात येत आहे.**

(रामानंद तिवारी )
राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई

मुंबई,
दिनांकः २९.०९.२००९